






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





हिरोची स्कूटर
स्कूटरचा हिरो

डेस्टिनी सिरीज़ पासून सुरू होते
₹75150*

कैश डिस्काउंट
₹3000*

SAIDEEP HERO | 9289922485, ILAKSHI AUTO SALES | 9289922398


रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२(६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २५.०३.२०२६ | अंक नं. २१४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020




अत्याधुनिक नेत्र शिबीर

चष्मा घालवा कायमचा

✲ कॉन्टयूरा व्हिजन ✲ मोतिबिंदू ✲ काचबिंदू ✲ नेत्ररोपण

मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया

शनिवार सकाळी १० ते १

वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१

डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा

दृष्टी साजरी करा

Help line 9112288611 / 8888982222





# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





संत राजिन्दर सिंह जी महाराज

यांच्या पावन सानिध्यात

मंगळवार, मार्च, 31/2026

संगत दर्शन - सायं 7 वाजता

बुधवार, एप्रिल, 1/2026

सत्संग - सायं 7 वाजता

नामदान (दिक्षा) - रात्री 9 वाजता


मिस्कीन मळा, गंगा उद्यान शेजारी, मिस्कीन नगर, सावेडी. अहिल्यानगर - 414003

7071050505/9067894213



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २५.०३.२०२६ | अंक नं. २९४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020






स्व. अरुणकाका जगताप

काका, आजही तुम्ही आमच्यासोबत आहात !

जयंतीदिनी विनम्र अभिवादन

MAHAVIR GROUP

YOUR VISION, OUR REALTY

श्री. राजेश संतोष भंडारी (टाकळी ढोकेश्वर)

Design Addict

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# दारू पिण्यास मज्जाव केल्याने तरुणावर बिअरच्या बाटलीने जीवघेणा हल्ला

नगर – मित्राने दारू पिऊ नये म्हणून दिलेल्या सल्ल्याचा राग मनात धरून तिघांनी एका तरुणावर प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना चिचोंडी पाटील शिवारात घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुनील महादेव वाघ हे त्यांचे नातेवाईक रावसाहेब विठ्ठल शिंदे, सुनील साहेबराव माळी आणि बाळू भाऊसाहेब शिंदे यांच्यासोबत नदीकाठी मासे पकडण्यासाठी गेले होते. त्याठिकाणी जेवण करत असताना सुनील माळी हा दारू पीत होता. फिर्यादी सुनील वाघ यांनी त्याला तू लहान आहेस, दारू पिऊ नको असा आपुलकीचा सल्ला दिला. मात्र, हा सल्ला सुनील माळीच्या जिव्हारी लागला.

रागाच्या भरात सुनील माळी याने हातातील बिअरची बाटली सुनील वाघ यांच्या डोक्यात पाठीमागून जोरात मारली. यामध्ये वाघ गंभीर जखमी होऊन त्यांच्या डोक्यातून रक्त येऊ लागले. याच वेळी रावसाहेब शिंदे आणि बाळू शिंदे यांनीही त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. आमच्या नादी लागू नको, तुला बघून घेऊ अशी धमकी देत आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. जखमी अवस्थेत वाघ यांनी स्वतःच्या दुचाकीवरून ग्रामीण रुग्णालय गाठले. तेथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

याप्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला असून पोलीस हवालदार सरोदे पुढील तपास करत आहेत.



अहिल्यानगर शहरातील पेट्रोल पंपांवर नागरिकांची पेट्रोल भरण्यासाठी दुसऱ्या छायाचित्रात घरगुती गॅस सिलिंडरसाठी दाणे डबरा येथील ग्राहक भंडार येथे लागलेली मोठी रांग. (छाया – धनेश कटारिया)

# लॉकडाऊनसदृश निर्बंधांच्या भितीने लोकांची उडाली गाळण; गॅसपाठोपाठ आता पेट्रोल, डिझेलसाठीही लागल्या मोठ्या रांगा

नगर – आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धामुळे भारतात मोठ्या प्रमाणात गॅस टंचाई सुरु झाली आहे. औद्योगिक, व्यावसायिक गॅसचा मोठा तुटवडा आहे. दरम्यान दोन दिवसांपासून सोशल मीडियावर लॉकडाऊनसदृश निर्बंधने येणार असल्याची अफवा पसरली आहे. त्यामुळे नागरिक पेट्रोल, डिझेलचा साठा करुन ठेवण्यासाठी पेट्रोल पंपांवर रांगा लावू लागले आहेत. त्यामुळे खऱ्या गरजूंची हेळसांड होत आहे. अद्याप गॅस एजन्सीसमोरील रांगाच कमी झालेल्या नसताना आता पेट्रोल पंपांवरही मोठ्या प्रमाणात रांगा लागल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसत आहे.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा कंपन्यांकडून सुरळीत होत नसल्यामुळे नागरिकांना तासन्तास रांगेत उभे रहावे लागत आहे. २५ मार्च रोजी शहरातील दाणे डबरा येथील ग्राहक भंडार येथे गॅस टाकी घेण्यासाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसून आल्या. काही नागरिक आगाऊ बुकींग करुन साठे करीत असून, त्यामुळे खरे गरजवंत गॅसपासून वंचित राहत असल्याच्याही तक्रारी येऊ लागल्या आहेत.

गॅसपाठोपाठ आता पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठाही विस्कळीत झाल्याचे चित्र आहे. अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्याचे २५ मार्च रोजी दिसून आले. काही पेट्रोल पंपांनी पेट्रोल संपल्याचे जाहीर केले तर ज्या काही पंपांवर इंधन उपलब्ध आहे, तेथे नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. वाहनधारकांना तासन्तास रांगेत उभे राहून पेट्रोल भरावे लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान सोशल मीडियावर पुन्हा लॉकडाऊनसदृश्य निर्बंध लागू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अनेकजण पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा साठा करण्याकडे वळले आहेत. परिणामी, कृत्रिम टंचाई निर्माण होऊन खऱ्या गरजवंतांचे हाल वाढत आहेत. दुसरीकडे, सरकारकडून मात्र पुरवठा सुरळीत असल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र प्रत्यक्ष परिस्थितीत नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींमुळे प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# ड्रेनेजच्या उघड्या चेंबरमध्ये पडले पुजारी; निष्काळजीपणाचा कळस, नागरिकांना त्रास

## एकविरा चौक ते बीएसएनएल कॉलनी रस्त्यातील चेंबरवर आंथरला प्लास्टिक कागद

नगर – सावेडीतील एकविरा चौक ते बीएसएनएल कॉलनी रस्त्याचे सिमेंट काँक्रिटचे काम सुरू आहे. हे काम करताना ठेकेदाराच्या निष्काळजीपणाचा कळस सावेडीकरांना अनुभवायला मिळाला. या रस्त्यावर असणाऱ्या ड्रेनेजच्या चेंबरवर कोणतेही झाकण न ठेवता किंवा तेथे बॅरिकेटिंग न करता, सूचना फलक न लावता ठेकेदाराने त्यावर पातळ प्लायवूड टाकले. त्या प्लायवूडवर चक्क प्लास्टिकचा कागद अंथरला. त्यामुळे हा कागद वाऱ्याने अडून आलेला असे समजून त्यावर पाय देणारे एक पुजारी थेट त्या चेंबरमध्येच पडले. ही घटना २५ मार्च रोजी सकाळी ८ ते सव्वा ८ वाजेच्या सुमारास घडली.


एकविरा चौक ते बीएसएनएल कॉलनी रस्त्यावरील चेंबरमध्ये पडलेल्या पुजाऱ्यांना नागरिकांनी तात्काळ सुरक्षित बाहेर काढले.

याबाबत सावेडीतील प्रतिष्ठित व्यावसायिक मनसुख वाबळे यांनी सांगितले की, एकविरा चौक ते बीएसएनएल कॉलनी रस्त्याचे सिमेंट काँक्रिटचे काम सुरू आहे. हे काम करताना ठेकेदाराने सुरक्षेच्या दृष्टीने काहीही उपाययोजना केलेल्या नाहीत. या रस्त्यावर असलेल्या ड्रेनेज लाईनच्या चेंबरवर सुरक्षित झाकण न बसवता त्यावर एक हलके प्लायवूड टाकून त्यावर प्लास्टिक कागद अंथरण्यात आला होता. त्यामुळे या उघड्या चेंबरचा अंदाज न आल्याने २५ मार्च रोजी सकाळी ८ ते सव्वा ८ वाजण्याच्या सुमारास एक व्यक्ती त्या उघड्या चेंबरमध्ये पडली. ही घटना ममता गॅस एजन्सीसमोरच घडली. संबंधित व्यक्ती ममता गॅस एजन्सीमध्ये गॅस घेण्यासाठी आले होते. ते मूळचे धामणगाव कडा (ता. आष्टी) येथील ब्राम्हण समाजाचे पुजारी असून सध्या ते सावेडीत वास्तव्यास आहेत. रस्त्यावर असलेल्या कागदामुळे ते चेंबर असल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. त्यामुळे ते त्या चेंबरमध्ये पडले. तेथे असणाऱ्या नागरिकांनी त्यांना तातडीने चेंबरमधून वर काढले. ही घटना ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे घडली आहे. वास्तविक तेथे ठेकेदाराने बॅरिकेटिंग करणे गरजेचे होते. सुचना फलक लावणे आवश्यक होते. मात्र, ठेकेदाराने त्याकडे दुर्लक्ष केले. ही घटना रात्रीच्यावेळी घडली असती तर गंभीर स्वरुपाच्या परिणामाला सामोरे जावे लागले असते, अशी भितीही वाबळे यांनी व्यक्त केली आहे. या ठिकाणी तात्काळ योग्य बॅरिकेटिंग करण्याची मागणी स्थानिकांमधून केली जात आहे. अन्यथा एखादा लहान मुलगा किंवा वाहन त्या चेंबरमध्ये पडल्यास मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भितीही व्यक्त केली जात आहे.


# रामनवमी मिरवणुकीची तीन मंडळांना परवानगी; रात्री १० वाजेपर्यंतच काढता येणार मिरवणूक

नगर – रामनवमीनिमित्त नगर शहरात २६ मार्च रोजी पारंपरिक मिरवणूक काढण्यात येणार असून, यासाठी पोलीस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. २६ मार्च रोजी सकल हिंदू समाज, हिंदू राष्ट्र सेना आणि सावेडीतील वास्तव कंपनी या तीनच मंडळांना मिरवणूक काढण्यास परवानगी देण्यात आली आहे. मिरवणुकीत डीजे लावून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या डीजे चालक–मालक आणि संबंधित मंडळावरही गुन्हे दाखल करण्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

मिरवणुकीसाठी रात्री १० वाजेपर्यंतच परवानगी देण्यात आली असून, सर्व मंडळांनी याचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मिरवणूक पारंपरिक मार्गानेच काढण्यात येणार आहे. काही मंडळांनी तख्ती दरवाजामार्गे मिरवणूक काढण्याची परवानगी मागितली होती; मात्र कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ही मागणी नाकारण्यात आली आहे. मात्र, सकल हिंदू समाज याच मार्गाने मिरवणूक काढण्यावर ठाम आहे. आम्हाला मुख्यमंत्र्यांनी याच मार्गावरुन मिरवणूक काढण्याला परवानगी दिली असल्याचा दावा सकल हिंदू समाजाकडून करण्यात येत आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यावर काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे. बंदोबस्तासाठी दोन पोलीस उपअधीक्षक (डिवायएसपी), १४ पोलीस निरीक्षक (पीआय), सुमारे ३०० पोलीस कर्मचारी आणि १०० होमगार्ड तैनात असणार आहेत. याशिवाय एसआरपी व आरसीपीची प्रत्येकी एक प्लाटून (प्रत्येक प्लाटूनमध्ये ३० जवान) सज्ज ठेवण्यात आले असून, शिघ्र कृती दल (क्यूआरटी– क्विक रिस्पॉन्स टीम) पथकही नियुक्त करण्यात आले आहे. शहरातील संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्यासाठी ४५ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. तसेच संपूर्ण मिरवणुकीवर ड्रोनद्वारेही नजर ठेवली जाणार आहे. शांततेत आणि उत्साहात रामनवमी साजरी करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस विभागाकडून करण्यात आले आहे.

## श्रावण (बाबा) निकम यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील बालिकाश्रम रोडवरील रहिवासी श्रावण (बाबा) बारकू निकम (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

श्रावण निकम हे गुरुकृपा हेअर आर्ट या सलून दालनातून व्यवसाय करीत होते. त्यांचे चिरंजीव ज्ञानेश्वर निकम यांनीही विजय सलून नावाने हाच व्यवसाय पुढे सुरू ठेवले आहे. नाभिक समाजाचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत.

## ॲड. कुलदीप काळे यांचे हृदयविकाराने निधन




नगर – सावेडी येथील गुलमोहोर रोड परिसरातील रहिवासी ॲड. कुलदीप रमेश काळे (वय ४७) यांचे २५ मार्च रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ मुलगा, भाऊ, बहीण असा परिवार आहे. ॲड. सुधीर भापकर यांचे ते जावई होत.

## अंजनाबाई रंगा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – तोफखाना येथील रहिवासी सौ. अंजनाबाई रंगा (वय ६४) यांचे २५ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सागर रंगा यांच्या त्या मातोश्री तर सुरेश रंगा यांच्या पत्नी होत.


## हनुमान चालिसा पाठ

**गुरुवार दि. २६/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**रामजन्मोत्सव (रामनवमी)** दक्षिणमुखी हनुमान मंदिर, सर्जेपुरा, वेळ – दु.१२.०३

**प्रेमप्रकाश मंदिर,** कृपाल आश्रमाच्या मागे, गंगा उद्यान जवळ, मिस्कीन मळा, तलरेजा परिवार ९८२२४३४९८२

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**नवनाथ तरुण मंडळ,** सुडके मळा, बालिकाश्रम रोड, नरेश बिल्ला ९५४५४७४७४२, संदीप सुडके ९०२१६०६०६०

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**श्रीराम मंदिर,** देशमुख नगर, नागरदेवळे, भिंगार ९४२०१२००२७

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**राजज्योती नगर मित्र मंडळ,** प्रकाशलाल, आनंद, आशिष देसर्डा परिवार, राजज्योती नगर, आर्यन लॉन जवळ, बुरुडगाव रोड

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**प्रताप राम भोजने,** जमुनी निवास, सुयोग पार्क, गाडळकर नगर, कल्याण रोड ९८६००३३०४०, ९२७०२७०७५३

# वाढीव घरपट्टी रद्द, मूळ दरानुसारच आकारणी

## पाणीपट्टीमध्ये २७ टक्के कपातीचा प्रस्ताव; मनपा स्थायी समितीकडून १७३८ कोटींचे अंदाजपत्रक महासभेत सादर; २७ मार्च रोजी सविस्तर चर्चा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने भाडेकरु दरानुसार केलेली वाढीव घरपट्टी रद्द करीत मनपाच्या मूळ दरानुसारच आकरणी करण्याचे आणि पाणीपट्टीमध्ये २७ टक्के कपात करण्याची शिफारस करीत महापालिकेचे १७३८ कोटींचे अंदाजपत्रक महासभेत सादर केले. २५ मार्च रोजी आयोजित महासभेत स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे हे अंदाजपत्रक सुपूर्द केले. या अंदाजपत्रकावर २७ मार्च रोजी सविस्तर चर्चा करण्यात येईल, असे सांगत महापौरांनी सभा तहकूब केली.


महापालिकेच्या महासभेत १७३८ कोटींचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय गाडे, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, आयुक्त यशवंत डांगे आदी. (छाया – लहू दळवी)

या महासभेला आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहर लहारे तसेच स्थायी समिती सदस्य व नगरसेवक उपस्थित होते.

सभापती सुभाष लोंढे म्हणाले, वाढीव घरपट्टी व पाणीपट्टीचा ठराव रद्द करून जुन्या दरानुसार आकारणी करावी. महापालिकेचे सध्याचे बजेट फुगीर असल्याची टीकाही त्यांनी केली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या सहकार्याने हे अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले. आयुक्तांनी १७१० कोटींचा अर्थसंकल्प सादर केला होता. स्थायी समितीने नागरिकांच्या गरजेनुसार सुधारणा करून त्यात बदल सुचवले असून तो अधिक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्थिक परिस्थिती लक्षात घेता उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले. मालमत्ता हस्तांतरण फी, अनधिकृत बांधकाम नियमितीकरण, मालमत्ता नोंदणी शुल्क, गुंठेवारी विकास, शाळा भाडे, रस्ता फोडणे–जोडणे, अतिरिक्त चटई क्षेत्र व पाणी मीटरद्वारे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

मालमत्ता रिव्हिजनमध्ये खाजगी संस्थांकडून झालेल्या अनियमिततेमुळे नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून भाडेकरू दरानुसार आकारलेली घरपट्टी रद्द करून मनपाच्या मूळ दरानुसार आकारणी करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच पाणीपट्टीमध्ये २७ टक्के कपात करण्याचाही प्रस्ताव आहे. कल्याण रोड परिसरात वाढत्या वस्त्यांमुळे पाणीटंचाई लक्षात घेता विद्यानगर व कल्याण रोड येथे नवीन पाण्याची टाकी उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी नेहरू मार्केट, रंगभुवन व प्रोफेसर कॉलनी येथे भव्य शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याचे नियोजन आहे. शहरात ई–बस सेवा सुरू करण्यासाठी ४० बसेस चालविण्याचे नियोजन असून पहिल्या टप्प्यात १० बसेस सुरू करण्यात येणार आहेत. सीना नदी खोलीकरण व रुंदीकरणासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून बाबर मळा ते लोखंडी पूल या दरम्यान काम सुरू होणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ५०४ घरकुलांचा प्रकल्पही उभारण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.



राहुरी विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने प्रक्रियेतील अधिकाऱ्यांसाठी भारत निवडणूक आयोगाच्या विविध माहिती तंत्रज्ञान प्रणालींच्या वापराबाबत सर्वसमावेशक प्रशिक्षणामध्ये मार्गदर्शन करताना विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णे.

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी अधिकाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या माहिती तंत्रज्ञान प्रणालींचे प्रशिक्षण

नगर – २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक २०२६ च्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रियेतील अधिकाऱ्यांसाठी भारत निवडणूक आयोगाच्या विविध माहिती तंत्रज्ञान प्रणालींच्या वापराबाबत सर्वसमावेशक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. हे प्रशिक्षण राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राचे जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णे तसेच 'जिल्हा माहिती तंत्रज्ञान कक्षाच्या' (डीआयटी) पथकाकडून देण्यात आले. तंत्रज्ञानाचा प्रभावी व अचूक वापर करून आगामी पोटनिवडणूक पारदर्शक व निर्दोषपणे पार पाडण्याच्या उद्देशाने या महत्त्वपूर्ण प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षण सत्रामध्ये निवडणूक आयोगाच्या अत्यंत महत्त्वाच्या संगणकीय प्रणालींच्या प्रत्यक्ष कार्यपद्धतीवर अधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने आचारसंहिता भंगाच्या तक्रारी नागरिकांना थेट व जलद गतीने नोंदवता याव्यात, यासाठी विकसित केलेल्या 'सी–व्हिजिल' या भ्रमणध्वनी प्रणालीची (ॲपची) माहिती देण्यात आली. तसेच, निवडणूक प्रक्रियेतील अधिकृत संदेशवहन व्यवस्थापनासाठीची 'ई–एसएमएस' प्रणाली आणि उमेदवारांची माहिती व निवडणूक निकाल व्यवस्थापनासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या 'एन्कोअर' प्रणालीच्या सर्व भागांचे सखोल प्रशिक्षण यावेळी देण्यात आले.

याव्यतिरिक्त, संरक्षण दलातील व इतर पात्र मतदारांसाठी असलेल्या 'इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वितरित टपाल मतदान व्यवस्थापन प्रणाली' (ईटीपीबीएमएस) आणि प्रत्यक्ष मतदान केंद्रावरील कामकाजासाठी मतदान केंद्राध्यक्षांकरिता तयार करण्यात आलेल्या विशेष संगणकीय प्रणालीच्या (पीआरओ ॲप्लिकेशन) वापराबाबतही अधिकाऱ्यांना अवगत करण्यात आले. या सर्व अद्ययावत तंत्रज्ञान प्रणालींच्या अचूक वापरामुळे आगामी निवडणूक प्रक्रियेत अधिक गतिमानता, सुलभता व पारदर्शकता येईल, असा विश्वास या प्रशिक्षणादरम्यान व्यक्त करण्यात आला.



# वास्तुशास्त्रात मोज मापाचे महत्व

बहुसंख्य लोकांना अग्नेय दिशेला स्वयंपाक घर, नैऋत्य दिशेला बेडरूम, वायव्य दिशेला गेस्ट रूम आणि ईशान्य दिशेला देवघर एवढे झालं की वास्तुशास्त्र झालं असा समज असतो किंवा असा समज करून दिलेला असतो. पण ही फक्त भवनाची सामान्य रचना झाली. वास्तुशास्त्र हे द्वी ऊर्जा पद्धतीचे शास्त्र आहे. भूगर्भातील ऊर्जेचे आणि वैश्विक ऊर्जेचा सुखद मिलाफ आणि समतोल आपल्या वास्तूमध्ये साधत व्यक्तीच्या जीवनात मोठे अनुकूल परिवर्तन घडवून आणायचे ते उत्तम ऊर्जा शास्त्र आहे. ऊर्जेच्या दृष्टिकोनातूनच शास्त्राचा विचार होणे गरजेचे आहे.त्यामुळे निव्वळ रचनेच्या मागे लागून उभारलेली बांधकामं सुद्धा बऱ्याच वेळेला व्यक्तीला फारसा अनुकूल परिणाम दाखवू शकत नाही.

चौकोनी किंवा आयताकृती प्लॉट सोडून इतर कोणत्याही आकाराचे म्हणजे त्रिकोणी, पंचकोनी, षटकोनी, अष्टकोनी, आकाराचे प्लॉट हे त्या जमीन मालक, इंजिनियर, आर्किटेक्ट बरोबर आपली ही विकेट कधी घेतील हे सांगता येत नाही. म्हणून प्लॉट सिलेक्शन हा भवन उभारणीमध्ये फार मोठा मुद्दा असतो. त्यानंतर सगळ्या रचना.

समजा एखादा बंगला अथवा स्कीम करायची आहे किंवा उद्योग उभारणीसाठी प्लॉट घेतलेला आहे तर त्या जमिनीचा अभ्यास करणे हे महत्त्वाचं आहे कारण वास्तुशास्त्रात भूखंडाच्या आकाराला जसं महत्त्व आहे तसे प्रकारालाही महत्त्व आहे आणि त्यापेक्षाही जास्त महत्त्व भूखंडाच्या मोजमापालाही म्हणजेच लांबी आणि रुंदी ला सुद्धा आहे. समजा एखादा भूखंड (प्लॉट) हा ७१ फूट बाय ९१ फूट अशा लांबी रुंदीचा आहे तर अशा वास्तूवर म्हणजेच अशा प्लॉटवर बांधलेले भवन हे एखाद्या व्यापाऱ्याला त्याच्या व्यवसायात खूप उच्च स्थानी नेण्यासाठी कारणीभूत असू शकतं. पण समजा एखादा भूखंड हा ७० फूट बाय ९० फूट लांबीचा आहे तर अशा वास्तूवर म्हणजेच प्लॉटवर बांधलेले भवन हे त्या भवनात राहणाऱ्या सदस्यांच्या मानसिक त्रासाला कारणीभूत असू शकतं. म्हणून वास्तु घेतल्यावर म्हणजेच प्लॉट घेतल्यावर भवन निर्मिती करताना तो प्लॉट, व्यक्ती त्याचा व्यवसाय अथवा नौकरी आणि परिसर यांची सांगड घालणं महत्त्वाचे ठरते. अशासाठी नेमके भवन निर्मिती करताना काय करावे याचा वास्तुशास्त्रात नेमका विचार केला गेलेला आहे.

यासाठी भवन निर्मिती करताना प्लॉट प्रत्यक्ष पाहून परिसर आणि प्लॉट मालकाच्या एकूण सर्वांगीण स्थितीचा अभ्यास करून तो भू रचनेत आणि भवन रचनेत सुसंगत सहज बसतो की नाही याचा प्राथमिक विचार करणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी प्रथम प्लॉट (म्हणजे वास्तू), प्लॉट रचना, प्लॉटवर काही करावे लागणारे भौगोलिक फेरफार जोत्या ची उंची आणि आकार प्लॉटचे आणि भवनाचे प्रवेशद्वारं निश्चिती आणि त्यात घालून द्यायची सुसंगती. भिंतीची जाडी, उंची, खेळती हवा राहण्यासाठी आणि नैसर्गिक प्रकाशासाठी योग्य प्रभागातून व्हेंटिलेशन करणे आवश्यक ठरते. भवनाची लांबी रुंदी,आतील खोल्यांची लांबी रुंदी, उंची, फर्निचर ची मापे, बेड ची मापे आणि त्यांची रचना यांचा ताळमेळ घालता आला पाहिजे. म्हणूनच नुसत्या भवन रचनेवर वास्तुशास्त्राकडून फार मोठी अपेक्षा करणं योग्य ठरत नाही. म्हणूनच वास्तुशास्त्रापासून आपल्याला अपेक्षित फायदा करून घ्यायचा असेल तर भवन निर्मिती करताना किंवा बंगला बांधताना प्लॉटचं योग्य नियोजन आणि तयार होणाऱ्या भवनांच्या रचनेचा विचार करून त्यांची वैश्विक उर्जेबरोबर सांगड घातली गेली तर नियती ला प्रारब्ध बदलण्याची एक गवसणी घालता येणे शक्य आहे.

**– डॉ. कौस्तुभ काळे, वास्तू वाचस्पती, अहिल्यानगर. मो. ९८५०९४१८८१**

# रात्र शाळेतील विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने जिद्दीचे प्रतीक

**ज्योतीताई कुलकर्णी यांचे प्रतिपादन,दिवसभर काम करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळाली नवी दिशा व प्रोत्साहन, भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये मासूम संस्थेचा उपक्रम**


शिक्षणानंतर करिअरच्या विविध वाटा आणि रोजगाराच्या संधी याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे मासूम संस्थेच्या माध्यमातून मार्गदर्शन करताना ज्योतीताई कुलकर्णी.

नगर – रात्रशाळेतील विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने जिद्दीने मेहनत करत आहेत परंतु कौशल्याचे प्रमाणपत्र नसल्याने मेहनतीचे योग्य मानधन मिळत नसल्याने त्यांना कौशल्य व कौशल्याच्या प्रमाणपत्राचे महत्त्व ज्योतीताई कुलकर्णी यांनी सांगितले. दिवसभर काम करूनही शिक्षण घेण्याची त्यांची चिकाटी प्रेरणादायी आहे. अशा विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते नक्कीच आयुष्यात मोठे यश मिळवू शकतात. हा उपक्रम त्यांच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षणानंतर करिअरच्या विविध वाटा आणि रोजगाराच्या संधी याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे मासूम संस्थेच्या माध्यमातून मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसा विविध ठिकाणी काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना समाजात सक्षमपणे उभे करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला इयत्ता ८ वी ते १२ वीतील आजी–माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रात्रशाळेच्या चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी होत्या. यावेळी मासूम संस्थेच्या सीनियर प्रोग्राम मॅनेजर गजाला शेख, प्लेसमेंट ऑफिसर अनुराधा पवार, इंडियन फॅशन अॅकॅडमीच्या संचलिका रचना काकडे, प्राचार्य व मासूम संस्थेचे सल्लागार सदस्य सुनिल सुसरे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राचार्य सुनिल सुसरे यांनी रात्रशाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांना आयुष्यात उभे राहण्यासाठी दिशा देणारे केंद्र आहे. शिक्षणासोबतच कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी यांची माहिती मिळणे आजच्या काळाची गरज आहे. त्यामुळे अशा मार्गदर्शन उपक्रमांचे महत्त्व अधिक असल्याचे ते म्हणाले.

गजाला शेख म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षणावर न थांबता विविध कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. आजच्या स्पर्धात्मक युगात व्यावसायिक प्रशिक्षण, डिजिटल कौशल्ये आणि आत्मविश्वास या गोष्टी यशासाठी अत्यंत आवश्यक आहेत. मासूम संस्था विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व शिष्यवृत्तीच्या माध्यमातून पुढे जाण्याची संधी देत असल्याचे स्पष्ट केले.

अनुराधा पवार यांनी प्रशिक्षणानंतर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. योग्य मार्गदर्शन, कौशल्य आणि सातत्य याच्या जोरावर विद्यार्थी नोकरी तसेच स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात. विद्यार्थ्यांनी संधी ओळखून त्याचा योग्य वापर करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण, शासकीय योजना, तसेच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मासूम संस्थेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या उपक्रमास संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, डायरेक्टर युवराज बोऱ्हाडे, कमलाकर माने, करिअर सेल प्रमुख स्नेहल ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, अनंत फडणीस, डॉ. रमेश झरकर, डॉ.पारस कोठारी आदींनी उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वृषाली साताळकर, अनुराधा दरेकर, बाळासाहेब गोरडे, शिवा शिंदे, कैलास करांडे, गजेंद्र गाडगीळ, महादेव राऊत, अमोल कदम, मंगेश भुते, अशोक शिंदे, प्रशांत शिंदे, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे, उज्वला साठे, वैशाली दुराफे, स्वाती होले आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन शरद पवार यांनी केले. संदेश पिपाडा यांनी आभार मानले.

# सृष्टीचा सृजनकर्ता ब्रह्मदेवाने गुढीपाडव्याला सृष्टीची निर्मिती केल्याने हा मुहूर्त चांगला

**अशोक जाधव महाराज यांचे निरुपण, श्री स्वामी समर्थ मंदिरात सहस्र कलश अभिषेक**

नगर – सृष्टीचा सृजनकर्ता करता असलेल्या ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती चैत्रप्रतिपदे पासून केली, हा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक समजला जातो. आज श्री स्वामी समर्थ यांना सहस्र कलश अभिषेक करण्याचा अमृतयोग लाभला हे माझे भाग्य समजतो. गुढीपाडव्याच्या दिवशी सृष्टीची उत्पत्ती झाल्याने या दिवशी सूर्य, चंद्र व संपूर्ण राशीचक्र प्रारंभीच्या ठिकाणापासून भ्रमण सुरू करतात. भारतीय ज्योतिष शास्त्रानुसार गुढीपाडवा हा साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक आहे, असे निरुपण केडगाव येथील शंकर महाराज मठाचे अशोक जाधव महाराज यांनी केले.

सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिराचा २० वा वर्धापन दिन व प्रकट दिना निमित्त गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अशोक जाधव महाराज यांनी गुरुवारी सहस्र कलश अभिषेक केला यावेळी भाविक उपस्थित होते. भाविकांना गुढीपाडव्याचे महत्त्व विशद करून भारतीय संस्कृतीमधील भक्तीयुक्त धारणेनुसार विजय व यशाचे सर्व श्रेय नेहमीच निसर्ग अथवा परमेश्वराला दिले जाते म्हणूनच यशासाठी परमेश्वराच्या प्रती लीन होऊन गुढी उभारण्याची प्रथा आहे. असे त्यांनी सांगितले.

गुरुवारी सकाळी श्री स्वामी समर्थ मूर्तीला जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर हवंना ची उदी, हळद, कुंकू एकत्र करून मूर्तीस स्नान घालण्यात आले. अकरा लिटर दुधात, सव्वा किलो साखर, एक किलो मध, एक किलो दही, एक किलो आम्रखंड, एक किलो गावरान तूप एकत्रित करून पुन्हा दुग्ध स्नान घालण्यात आले.

या अभिषेकानंतर सात किलो गुलाबांची फुले वापरून स्वामींना फुलांच्या पाकळ्यांमध्ये गुंफण्यात आले गुलाबी रंगाच्या फुलात स्वामींची मूर्ती तेजोमय दिसत होती. हे आकर्षक रूप पाहण्यासाठी मंदिरात भाविकांनी गर्दी करून दर्शनाचा लाभ घेतला. दुपारी नववर्षानिमित्त होमहवन करण्यात आले.

यावेळी दश सहस्त्र ओम श्री स्वामी समर्थ नमो नमः या नामजपा मधे हवनाचा कार्यक्रम पार पडला. आरती होऊन प्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.


श्री स्वामी समर्थ मंदिरात केडगाव येथील शंकर महाराज मठाचे अशोक जाधव महाराज यांच्या हस्ते सहस्र कलश अभिषेक करून पूजा करण्यात आली. (छाया– विजय मते)


मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी संचलीत मासुमिया शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्रशिक्षकांचा छात्रसेवाकालाचा समारोप गुरुकुल इंग्लिश मिडीयम शाळेमध्ये पार पडला.

# गुरुकुल इंग्लिश मिडीयम शाळेमध्ये सेवापूर्तीकाल साजरा

नगर – मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी संचलीत मासुमिया शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्रशिक्षकांचा छात्रसेवाकालाचा समारोप गुरुकुल इंग्लिश मिडीयम शाळेमध्ये पार पडला. छात्रशिक्षकांनी दैनंदिन तासिकांप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करुन विविध उपक्रम, स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रश्नमंजुषा, टाकाऊपासून टिकाऊ, खेळ– वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुकुल शाळेचे मुख्याध्यापिका दिप्ती कऱ्हाळे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नूरमोहंमद पठाण, समीर पठाण, शुभम टेमकर, डॉ.शेख एजाज होते.

यावेळी मुख्याध्यापिका दिप्ती कऱ्हाळे यांनी छात्रशिक्षकांच्या कामाचे कौतुक केले.

सय्यद शबाना, शेख शबाना, खान सबा, खान मिसबाह, शेख आफरीन व कर्मचारी उपस्थित होते. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी छात्रशिक्षकांनी परिश्रम घेतले.

# ऋचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेडचा जापानमध्ये जागतिक सन्मान

**व्हाइस प्रेसिडेंट नगरचे पुत्र रविकुमार मंगलारप यांचाही गौरव**

नगर – छत्रपती संभाजीनगर येथील ऋचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाचा समजला जाणारा टी पी एम एक्सेलँस अवॉर्ड २०२५ (TPM Excellence Award 2025) प्राप्त करत उल्लेखनीय कामगिरीची नोंद केली आहे. जपानमधील 'जापान इन्स्टिट्यूट ऑफ प्लॅन्ट मेंटेनन्स' (JIPM) या संस्थेतर्फे देण्यात येणारा हा पुरस्कार क्योटो येथील क्योटो इंटरनॅशनल कॉन्फरन्स सेंटर मध्ये पार पडलेल्या समारंभात प्रदान करण्यात आला.


जापानच्या क्योटो इंटरनॅशनल कॉन्फरन्स सेंटर मध्ये पुरस्कार स्वीकारताना कार्यकारी संचालक उमेश दाशरथी, संचालक ज्योती दाशरथी आणि व्हाइस प्रेसिडेंट रविकुमार मंगलारप आदी,

सन्मानाच्या वेळी कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट रविकुमार चंद्रकांत मंगलारप तसेच कार्यकारी संचालक उमेश दाशरथी, संचालक ज्योती दाशरथी यांनी संयुक्तपणे पुरस्कार स्वीकारला. विशेष म्हणजे, ऋचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्हाइस प्रेसिडेंट रविकुमार मंगलारप हे मूळचे अहिल्यानगरचे पुत्र असून त्यांच्या या यशामुळे नगरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

टोटल प्रॉडक्टिव्ह मेंटेनन्स या व्यवस्थापन प्रणालीच्या आठ स्तंभांवर आधारित कठोर आंतरराष्ट्रीय मूल्यमापनातून हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. गुणवत्ता, कार्यक्षमता आणि सतत सुधारणा या क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कंपन्यांना हा सन्मान दिला जातो. ऋचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेडने या सर्व निकषांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत हा मान मिळवला आहे.

उमेश दाशरथी यांच्या नेतृत्वाखाली कंपनीने सातत्यपूर्ण प्रगती साधली असून, ज्योती दाशरथी व संचालक रोहित दाशरथी यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे कंपनीने औद्योगिक क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित केले आहेत. कंपनीतील सर्व कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळेच कंपनीला हा जागतिक सन्मान मिळाल्याचे मानले जात आहे.

रविकुमार मंगलारप यांचे प्राथमिक शिक्षण तात्कालिक नगरपालिकेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत तर माध्यमिक शिक्षण अहिल्यानगर मध्येच श्री मार्कंडेय विद्यालय, गांधी मैदान येथे झाले आहे. त्याच वेळी इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेत शाळेत समाजातून प्रथम येण्याचा मान ही त्यांनी मिळवला होता.

# महिला ही देशाच्या प्रगतीची गुरुकिल्ली

**महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन, बुरुडगाव रोड साई उद्यान येथे जिजाऊ महिला प्रतिष्ठानचा 'होम मिनिस्टर' कार्यक्रम उत्साहात**



महिला दिनानिमित्त बुरुडगाव रोड येथील साई उद्यान येथे जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या वतीने 'होम मिनिस्टर' कार्यक्रमामध्ये महापौर ज्योतीताई गाडे आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या शिक्षणाची दारे खुली करून दिल्यामुळे आज महिला सर्वच क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. महिला ही फक्त कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण देशाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे, असे महापौर ज्योतीताई गाडे यांनी ठामपणे नमूद केले. त्या पुढे म्हणाल्या की, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सहकार्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. जिजाऊ मासाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले, त्याचप्रमाणे प्रत्येक महिलेने आपल्या घरातील मुलांना घडविण्याची जबाबदारी पार पाडावी. महिला जितक्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, तितक्या देशाच्या प्रगतीला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

महिला दिनानिमित्त बुरुडगाव रोड येथील साई उद्यान येथे जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या वतीने 'होम मिनिस्टर' कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाला महिलांचा प्रतिसाद लाभला असून विविध उपक्रमांच्या माध्यमातून महिलांना आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळाली.

माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या माध्यमातून प्रभागामध्ये राबविण्यात येणारे वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, गणेश विसर्जन व्यवस्थापन तसेच अभ्यासिका यांसारखे उपक्रम शहरासाठी दिशादर्शक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. जिजाऊ महिला प्रतिष्ठान गेल्या सात वर्षांपासून महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करून महिलांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास महापौर ज्योतीताईगाडे, माजीनगरसेविका शितलताई जगताप, जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा संगीता भोसले, नगरसेविका सुनिता फुलसौंदर, अलका मुंदडा, मनीषा भागानगरे, कोमल चोपडा, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संतोष भोसले, सुनील भोसले, विजय फुलसौंदर आदींसह महिला उपस्थित होत्या.

माजी नगरसेविका शितलताई जगताप म्हणाल्या की, होम मिनिस्टर कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला एकत्र येऊन आपल्या कलागुणांना वाव देतात. या कार्यक्रमातून विचारांची देवाण–घेवाण होते आणि महिलांना आनंददायी वातावरण मिळते.

जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा संगीता भोसले म्हणाल्या की, महिला दिन दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून महिलांचा सहभागही मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी सांगितले की, प्रभागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेमध्ये मोफत क्लास सुरू करण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा.

# कोहिनुर मॉल, नगर आयोजित चैत्र उत्सव कार्यक्रमास प्रतिसाद




नगर – मराठी अस्मितेचा आणि संस्कृतीचा जागर या संकल्पनेवर आधारित गुढीपाडवा आणि रामनवमीच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन २२ मार्च रोजी कोहिनुर मॉल येथे करण्यात आले होते. कार्यक्रमात अंजली नृत्यालय वैष्णवी कुलकर्णी प्रस्तुत रामस्तुती आणि खेळ मांडीयेला वाळवंटी घाई या विद्यार्थ्यांच्या नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. अनाहतच्या वतीने सौ. अनुजा कुलकर्णी, सौ. श्रेया सुवर्णपाठकी, सौ. अमृता बेडेकर, सौरभ साठे, कु. गायत्री धनलगडे, आनंद कुलकर्णी, अंबरीश जहागीरदार यांनी अभंग, भक्तीगीत, गौळण या गीतप्रकारांचे सादरीकरण केले. एमएमवायटीसीच्या वतीने मल्लखांब आणि रिदम योगा सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

नवोदित गायिका कु. आरोही बेडेकर हिने छत्रपती शिवाजी महाराजांचे गीत, अधिर मन झाले, मदन मंजिरी ही गाणी अत्यंत सुंदर सादर केले. तसेच स्वरोहम संगीत अॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत व ही मायभूमी ही गाणी सादर केली. चित्रकूट स्कूल व श्री संकट मोचन हनुमान सत्संग मंडळ यांच्या वतीने सामूहिक हनुमान चालीसाचे सादरीकरण अतिशय भक्तीमय वातावरणात केले. प्रभू श्रीरामांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. अतिशय भक्तीमय वातावरणात झालेल्या कार्यक्रमाला नगरकर रसिकांनी प्रतिसाद दिला. ऐश्वर्या सागडे यांनी सूत्रसंचालन केले.

कोहिनुर मॉलद्वारे वर्षभर सण उत्सवानिमित्त सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाला कोहिनुर मॉलच्या संचालिका सौ. श्वेता गांधी, चित्रकूट स्कूलचे संचालक अशोक सचदेव, अनाहतचे प्रसाद सुवर्णपाठकी, अविनाश शिरापुरी, संदीप कुलकर्णी, ओंकार देऊळगावकर, अंकित पवार, दीप्ती गुंदेचा, अमित डोंगरे आदी विद्यार्थी, पालक आणि रसिक उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### रात्री खा ओवा

भारतीय स्वयंपाकघर हे औषधी वनस्पतींचा खजिना मानले जाते. कारण स्वयंपाकघरातील मसाले आरोग्यासाठी वरदान आहेत. अशीच एक औषधी वनस्पती म्हणजे ओवा. त्याचे औषधी गुणधर्म पोटदुखीपासून ते गॅस, सर्दी आणि अपचनापर्यंत सर्व गोष्टींसाठी फायदेशीर ठरू शकतात. झोपण्यापूर्वी अर्धा चमचा ओवा खाणे हा एक प्रभावी उपाय मानला जातो. हा लहानसा वाटणारा घटक तुमच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकतो. झोपण्यापूर्वी अर्धा चमचा ओवा खाल्ल्याने आम्लता कमी होण्यास मदत होते. सेलेरीमध्ये थायमॉल नावाचा पदार्थ असतो, जो जठरासंबंधी रस सक्रिय करतो. रात्रीच्या जेवणानंतर जर तुम्हाला जड वाटत असेल तर ते पचनास मदत करते. पोटफुगी आणि आम्लता कमी करण्यासाठी हे एक रामबाण उपाय आहे. जर तुम्हाला सांधेदुखीचा त्रास होत असेल तर अर्धा चमचा ओवा खाणे फायदेशीर ठरू शकते. सेलेरीमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात. रात्रीच्या वेळी ते खाल्ल्याने शरीरातील वेदना, विशेषतः सांधेदुखीपासून आराम मिळतो.

## पाककला

### पिंक स्ट्रॉबेरी मूस

**साहित्य** फ्रेश स्ट्रॉबेरी १ कप (बारीक चिरलेली), विपिंग क्रीम १ कप (थंड), कंडेन्स्ड मिल्क ३-४ चमचे (गोडीनुसार), पिठीसाखर २ चमचे, सजावटीसाठी पुदिन्याची पाने किंवा डार्क चॉकलेटचे तुकडे

**कृती** : अर्धा कप स्ट्रॉबेरी आणि २ चमचे साखर मिक्सरमध्ये फिरवून त्याची स्मूथ प्युरी बनवून घ्या. एका मोठ्या भांड्यात थंड विपिंग क्रीम घ्या. ते घट्ट होईपर्यंत इलेक्ट्रिक बीटरने फेटा. फेटलेल्या क्रीममध्ये कंडेन्स्ड मिल्क आणि तयार केलेली स्ट्रॉबेरी प्युरी हलक्या हाताने मिक्स करा. (खूप जोरात हलवू नका, अन्यथा क्रीममधील हवा निघून जाईल). सर्व्हिंग ग्लासमध्ये खाली थोडे बारीक चिरलेले स्ट्रॉबेरीचे तुकडे टाका, त्यावर तयार केलेले गुलाबी मूस ओता. हे ग्लास फ्रिजमध्ये किमान १-२ तास सेट व्हायला ठेवा. वरून एक अख्खी स्ट्रॉबेरी किंवा चॉकलेट किसून सजवा.

## वास्तू

### नवीन गृहप्रवेश

नवीन घर बांधताना किंवा घेताना आधी वास्तूशास्त्रातील नियमानुसार घेतले जाते. मग घराचा दरवाजा, किचन अशा अनेक गोष्टी कोणत्या दिशेन असाव्या हे पाहिले जाते. कारण यावर घरातील सकारात्मक नकारात्मक ऊर्जा अवलंबून असते. जर घरातील काही गोष्टी चुकीच्या दिशेने असतील तर त्याचा घरात नकारात्मक परिणाम जाणवतो. त्यामुळे घरातील सुख, शांती, समाधानासाठी वास्तू नियम पाळणे गरजेचे आहे. यासाठी नवीन घरातील बाथरुम टॉयलेट, देवघर या गोष्टी योग्य दिशेने आहेत का ते पहावे.

## सौंदर्य

मुरुमांपासून मुक्त होण्यासाठी जांभूळ हा एक उत्तम पर्याय आहे. हे रक्त शुद्ध करते आणि शरीरास डिटॉक्सिफाई करते. त्यात अँटी बॅक्टेरियाचे गुणधर्म आहेत. यासाठी, बेरी आणि दूध मिसळून पॅक तयार करा. याचा उपयोग केल्यास मुरुमांच्या समस्येपासून मुक्तता मिळते.

## सल्ला

भाजीची ग्रेव्ही वाढवण्यासाठी कधीही थंड पाणी टाकू नका. नेहमी गरम पाणी वापरा. यामुळे मसाल्याची चव टिकून राहते आणि तरी छान येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २६ मार्च २०२६

**श्रीराम नवमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, आर्द्रा १६।१९, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. घरांत उत्साहाचे वातावरण होईल.

**वृषभ** : जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**कर्क** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**सिंह** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

**कन्या** : आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल.

**तूळ** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**वृश्चिक** : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा.


**धनु** : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. शत्रूंपासून सावध राहा.

**मकर** : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.


**कुंभ** : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**मीन** : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

# शब्दगंध क्र. ७३९५ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७३९४ चे उत्तर



**आडवे शब्द** :- १) राजस्थानातील एक ऐतिहासिक गाव जेथे महाराणा प्रतापांची राजधानी आहे ३) प्रयास; प्रयत्न; खटाटोप ६) पाढ्यातील सहाची संज्ञा ७) निरंतर; नित्य; पर्मनंट ८) मजुरांवर देखरेख करणारा १०) आशय; हेतू; स्वार्थ १२) एक सम संख्या; संवत्सरांची संख्या १३) ओढा; रोख; झोक १४) कहाणी; गोष्ट १६) अंगीकार; स्वीकार १८) अटीची भाषा १९) मैदा; सोजी

**उभे शब्द** :- १) दीर्घकाळ; जास्त काळ टिकणारे २) अस्थिर; डगमगीत; दोलायमान ३) वाळ्याचे अत्तर ४) एकसारखे लक्ष लावून; चकितपणाने ५) एक प्रकारची घोडागाडी ८) पुष्कळ; खूप; रगड ९) दहांचा समूह १०) एक धान्य; संन्यासी वगैरेंचे राहण्याचे ठिकाण ११) जुनेफाटके वस्त्र; चिंधी; पटकूर १२) ज्याची शिकार करावयाची आहे तो प्राणी १५) चापटी; थप्पड १६) सचोटीविषयीचा दुसऱ्याचा विश्वास १७) ऊस, फळ वगैरेतील द्रव; स्वाद; गोडी; चव

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : ठरवलं आणि लगेच झाले अस कधीच होत नाही थोडा संयम ठेवा हाल होतील पण हार होणार नाही.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## बंगला आणि हवेलीमध्ये काय फरक आहे?

कला, संस्कृती आणि इतिहासाचे मिश्रण दर्शविणाऱ्या, हवेली भारताच्या स्थापत्य वारशाचे प्रतीक म्हणून उभ्या आहेत. या भव्य हवेली त्यांच्या गुंतागुंतीच्या कोरीवकामाने, आश्चर्यकारक भित्तिचित्रांनी आणि समृद्ध कथांनी पर्यटकांना मोहित करत राहतात. भारताचा सांस्कृतिक वारसा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हवेलींची भव्यता जतन करणे आणि प्रदर्शित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बंगला हा शब्द बंगाली भाषेतून आला आहे, ज्याचा अर्थ बंगालचा आहे.

१९व्या शतकात बंगालमध्ये बांधलेल्या इमारती अशा प्रकारच्या होत्या की ब्रिटिशांनीही त्यांच्यापासून प्रेरणा घेतली. त्यानंतर अमेरिकेतही असे बंगले बांधले जाऊ लागले. हे लक्षात घेण्यासारखे आहे की प्रत्येक देश

लोकांच्या परिस्थिती, हवामान आणि आर्थिक स्थितीनुसार यामध्ये काही बदल झाले परंतु तरीही काही मूलभूत वैशिष्ट्ये तशीच राहिली, जसे की ते एकच छप्पर, ते फार उंचावर पसरलेले नाही, समोर रुंद व्हरांडा लॉन किंवा पार्किंग क्षेत्र (पूर्वी प्राण्यांचे क्षेत्र)

या बंगल्यांपासून प्रेरित होऊन ब्रिटीशांनी डाक बंगले बांधले, ज्यांना आपण आता विश्रामगृहे म्हणतो. त्यांना डाक बंगले म्हटले जात असे कारण या सुसज्ज इमारती टपाल वितरण केंद्राकडे जाणाऱ्या मार्गावर बांधल्या गेल्या होत्या आणि येणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्यांना राहण्यासाठी देखील वापरल्या जात होत्या. आता आपण हवेली (शहरातील घरे, मंदिरे) बद्दल बोलूया. हवेली हा शब्द हवली या पर्शियन शब्दापासून आला आहे, ज्याचा अर्थ प्रशस्त, खाजगी जागा किंवा इमारत आहे. आज आपल्याला दिसणाऱ्या प्राचीन वाड्या काही ऐतिहासिक वारसा जपून ठेवतात! त्या कोणत्यातरी मोठ्या कुटुंबाचे, जमीनदाराचे किंवा सावकाराचे प्रतीक आहेत! मौर्य साम्राज्यात अशा बहुमजली इमारतींचे चित्र दिसते. मुघल साम्राज्यापूर्वीही हवेली अस्तित्वात होत्या, परंतु मुघल काळात त्या अधिक प्रसिद्ध झाल्या. हवेलींना खास बनवणारी गोष्ट म्हणजे त्यांचा भव्य आकार आणि वास्तुकला.

त्याच्या मोठ्या आणि असंख्य खोल्यांमध्ये प्रचंड खिडक्या, बाल्कनी, कोरीवकाम, चित्रे आणि वायुवीजन आहे. सर्व उपक्रम मध्यवर्ती व्हरांडा येथे केले जात होते. या वाड्या इतक्या मोठ्या होत्या की त्यामध्ये संपूर्ण गाव सामावून घेता येईल. हत्ती आणि घोडे हवेलीच्या आत होते.

गुजरातमध्येही वैष्णव देव मंदिरांना हवेली म्हणून ओळखले जात असे. फाळणीच्या वेळी, पाकिस्तानमध्ये अनेक भव्य हवेल्या होत्या, ज्या आज भग्नावस्थेत आहेत. राजस्थानी वास्तुकलेचा प्रभाव असलेल्या सुंदर हवेल्या आग्रा, लखनौ, जैसलमेर, लाहोर, मुलतान आणि पेशावर येथे आढळतात.

या वाड्यांचे वैभव राजस्थानमध्ये अजूनही दिसून येते! अनेक इमारतींचे हॉटेल किंवा संग्रहालयात रूपांतर करण्यात आले आहे. या इमारती आपला ऐतिहासिक वारसा आहेत, ज्या जतन करण्यासाठी लक्ष देण्यास पात्र आहेत.

## जादूचे झाड

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे, एक मोठे झाड होते. तिथे राहणारे लोक ते पवित्र मानत होते. काही काळ गेला आणि त्या ठिकाणच्या राजाला एक मुलगी झाली. तिचे नाव राजकुमारी गिरीजा होते. राजकुमारी गिरीजाला बागेत खेळायला खूप आवडायचे. रोजचे दैनंदिन कामे आटोपल्यानंतर ती बागेत खेळण्यासाठी जायची.

एके दिवशी, राजकुमारी गिरीजा बागेत खेळत होती. एक फुलपाखरू तिच्या जवळ आले. त्याचे पंख हिऱ्यांनी जडवलेले होते. फुलपाखरू उडून गेले आणि गिरीजाने त्याचा पाठलाग जंगलात केला. काही वेळाने, गिरीजाला समजले की ती आपला मार्ग चुकली आहे. तेवढ्यात, एक जोरदार वादळ सुरू झाले. अचानक, तिच्या मागे असलेल्या झाडाच्या एका फांदीने हात पुढे केला, तिला उचलले आणि तिला सांगितले की ती तिथे आहे तोपर्यंत तिला घाबरण्याची गरज नाही. वादळ शांत होईपर्यंत झाडाने गिरीजाला स्वतःमध्ये लपवले. तोपर्यंत, गिरीजाला शोधणारे सैनिक आले आणि तिला राजवाड्यात परत घेऊन गेले.

आता हळूहळू गिरीजा आणि पिंपळाच्या झाडाची मैत्री वाढत गेली. राजाला हे कळताच तो काळजीत पडला. गिरीजाला धोका होईल या भीतीने त्याने जंगलातील सर्व झाडे तोडण्याचा निर्णय घेतला. राजाच्या आदेशानुसार, सैनिक झाडे तोडण्यासाठी जंगलात गेले, परंतु त्यांनी झाडाच्या फांद्या तोडताच, त्या झाडाला नवीन फांद्या फुटू लागल्या. सैनिक घाबरले. मग झाडाने गर्जना केली आणि म्हटले की वर्षानुवर्षे तो आणि त्याचे साथीदार मानवांसाठी हवा पुरवत आहे आणि आज हे लोक त्यांना नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. जर झाडे टिकली नाहीत तर मानवही टिकणार नाही. हे कळताच, राजाला त्याची चूक कळली. त्याने आपला निर्णय मागे घेतला आणि गिरीजा आणि झाडाच्या मैत्रीची काळजी करणे सोडून दिले.

तात्पर्य : झाड नेमीच सोबती असतात. जर जर झाडे टिकली नाहीत तर मानवही टिकणार नाही.

# जीवन का अमृत (भाग १)



सही प्रेम, एक दूसरे की आध्यात्मिक उन्नति में बहुत सहायक हो सकता हैं या फिर बाधा बन सकता है। आप यह रोजमर्रा की जिंदगी में देखते हैं। ७. जहाँ तक कर्मों का प्रश्न है, आपने इस विषय पर काफी विस्तार से विचार विमर्श किया है पर यह तो इस प्रकार की बहस कि पहले पेड़ बना या बीज। जितना ज्यादा आप इस विषय पर बहस करोगे, उतना ही आप उलझन में पड़ जाओगे। कर्मों का फल तो एक चक्र अच्छा, जिससे निकलना असंभव है, सिवाय उस तरीके जो 'इन्सान ! अपने आपको जान' नामक पुस्तिका में बताया गया हैं। अतः मैं आपसे निवेदन करूंगा कि आप इस विषय के बारे में ज्यादा चिंता ना करें, बल्कि अंतर में उन्नति करने की कोशिश करें और आप खुद देखेंगे कि कर्मों का चक्र कैसे चलता है। जब आप कारण मंडल में चढ़ाई करेंगे, तो हर वस्तु का 'क्यों और कहाँ', दिन की तेज धूप की तरह साफ-साफ नजर आएगा । इस परीक्षा की घड़ी में आप अंतर में रूहानी तौर से तरक्की करें, निर्देशों पर अमल करें, एक स्नेही और सदाचारी जीवन जीएँ, दूसरों की सहायता करें, जितनी भी आप कर सकें और अपने भजन-अभ्यास में निष्काम भाव से जुटे रहें ।

## क्यों और कहाँ

किस प्रकार यह विधान कार्य करता है और सारी, दृश्य और अदृश्य सृष्टि के भाग्य को नियंत्रित करता है। ये आधारभूत नियम कि 'जैसा बोओगे, 'वैसा काटोगे' और 'हर क्रिया के बराबर और विपरीत एक प्रतिक्रिया होती हैं,' हर जगह लागू होते हैं। मनुष्य जन्म सृष्टि की सरदार योनि है और यह सुनहरी मौका है, अपने आपको जानने का और प्रभु को पाने का ।

जिनको ऐसा दुर्लभ मौका (मनुष्य जन्म) मिला है और फिर भी वे इंद्रियों के भोगों रसों में उलझें पड़े हैं, खाने-पीने में सुख ढूँढ रहे हैं, जो कि निश्चित रूप से हैवानी इच्छाएँ और कुप्रवृत्तियाँ हैं, स्वाभाविक है, अपना मूल्य घटा रहें हैं और आखिरकार इस विशाल चक्र में चलते रहेंगे। पशुओं को देखो, जिनका सिर नीचे की ओर होता हैं, क्योंकि विधाता ने उन्हें ऐसा ही बनाया है और गर वे निम्न प्रवृतियों की

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

## नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

शिवानीदीदी : जेव्हा आपल्याला समजतं की आपण इथे हॉर्न वाजवू शकत नाही आणि पुढे जाण्यासाठी आपल्याला विनंती करावी लागणार आहे, आपण ते स्वीकारतो आणि तसं करण्याची तयारी ठेवतो. प्रत्येक वेळेस तुम्ही काय निवडता ह्यावर सगळं अवलंबून आहे.

सुरेश ओबेरॉय : आणि आपण ते करू शकतो. शिवानीदीदी : पूर्वी आपल्या अंगवळणी पडलेल्या सवयींमुळे काहीतरी नवीन बदल करणं अवघड आहे असं म्हणण्यापेक्षा आपण हे करू शकता, असं म्हटल्याबद्दल अभिनंदन. बदल करण्यासाठीची पहिली पायरी म्हणजे ङ्कआपण हे करू शकतोङ्क याची जाणीव होणं.

सुरेश ओबेरॉय : रस्त्यावर कचरा टाकणं बेकायदेशीर आहे हे आपल्याला माहीत आहे त्यामुळे आपण ते करत नाही.

शिवानीदीदी : कारण आपण स्वतःला सांगतो की तसं करण्याची परवानगी नाहीये. तसंच आपण स्वतःला हेही सांगितलं पाहिजे की, आपल्या संभाषणांमध्ये संताप आणि चिडचिड करण्याची परवानगी नाहीये.

सुरेश ओबेरॉय : हो, आणि आपण जे सांगू ते आपलं मन स्वीकारतं. आपण जर असं म्हटलं की आपण आपल्या मनाला पटवून देऊ शकत नाही तर तो एक बहाणा आहे का ? शिवानीदीदी : इतरांना दोष देण्याची सवय लागली आहे आपल्याला. आपण चिडलो यासाठी दुसरं कोणीतरी जबाबदार आहे असा विचार आपण करतो. आपल्याला राग येणं ही आपली निर्मिती आहे याची जाणीव नसणं हे इतरांना दोष देण्याचं दुसरं कारण. तिसरं म्हणजे आपण आपल्या कृतीचं समर्थन करतो.

ही पद्धत अवलंबिल्याचे परिणाम आपण आपल्या भूतकाळात जाऊन बघितले पाहिजेत. पहिला परिणाम म्हणजे आपली मनं सहज नाहीत आणि आपल्याला दुःख होतं. आपण इतरांकडून प्रेम आणि आनंद शोधत राहतो. दुसरा परिणाम म्हणजे आपलं शारीरिक स्वास्थ्य बिघडतं. आज आपली आहारपद्धती सर्वसंपन्न आहे. आपण व्यायाम करतो, आपल्याकडे वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत पण तरी आपण आरोग्याची खात्री देऊ शकत नाही. तिसरा आणि महत्त्वाचा परिणाम

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : काल आलेला भिकारी, तो खरा बदमाश होता...

नवरा : का... काय झालं...?

बायको : काल मी त्याला जेवण दिलं, आणि आज तो मला एक पुस्तक देऊन गेला...

नवरा : कोणते पुस्तक...??

बायको : स्वयंपाक करायला शिका

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* Jarline Anti task Guided Missile कोणत्या देशाकडून विकत घेणार आहेत? - अमेरिका

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## द्राक्षे

द्राक्ष हे फळ निसर्गाने आपल्या सर्वांना दिलेला अनमोल असा मेवा आहे. याच्या सेवनाने शरीरामध्ये नवचैतन्य निर्माण होऊन स्फूर्ती मिळते. द्राक्षाचे लालसर रंगाचे वेल असतात. शेतामध्ये मांडव करून त्यावर वेल चढविला जातो. युरोप, अमेरिकेमध्ये द्राक्षाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. तर भारतात पंजाब, हरियाणा आणि महाराष्ट्रातील पुणे, सातारा, नाशिक, जळगाव या भागात द्राक्षाची लागवड इंग्रजीमध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. मराठीमध्ये 'द्राक्षे', हिंदीमध्ये 'अंगुर', संस्कृतमध्ये 'द्राक्षा', 'ग्रेप्स', तर शास्त्रीय भाषेत 'विटीस विनिफेरा' या नावाने द्राक्षे ओळखली जातात.

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : काळी व हिरवी अशा दोन प्रकारची द्राक्षे असतात. यापैकी काळ्या द्राक्षांमध्ये औषधी गुणधर्म जास्त प्रमाणात असतात. त्यामुळे त्याचा वापर औषधांमध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. आयुर्वेदानुसार द्राक्षे ही मधुर रसात्मक, मधुर विपाकी आणि शीत वीर्याची असतात. तसेच द्राक्षे मृदू विरेचक, दाहनाशक, तृप्तीदायक, हृदय, श्रमहारक व ज्वरघ्न असतात.

आधुनिक शास्त्रानुसार : द्राक्षांमध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. तर 'अ' व 'ब' ही जीवनसत्त्वे कमी प्रमाणात असतात. द्राक्षांमध्ये फलशर्करा व पिष्टमय पदार्थ जास्त प्रमाणात असतात. ही फलशर्करा नैसर्गिक असल्यामुळे खाल्ल्याबरोबर लगेचच रक्तात शोषली जाते. त्यामुळे थकवा आलेला असल्यास द्राक्ष सेवन केल्यावर लगेचच ऊर्जा व उत्साह निर्माण होतो. नैसर्गिक फलशर्करेमुळे (ग्लुकोज) रुग्णांसाठी द्राक्ष हे आजारपणातील उत्तम टॉनिक आहे. शरीरामध्ये होणाऱ्या चयापचय प्रक्रियेसाठी ग्लुकोजची गरज असते. द्राक्ष सेवन केल्याने ही गरज भागविली जाते. त्यामुळे शरीरसंवर्धन व निरोगी आयुष्य जगण्यासाठी द्राक्षे उपयोगी आहेत. ताप, क्षय, अशक्तपणा, पचनशक्ती मंदावणे या विकारांवर द्राक्ष हे एक उत्तम औषध आहे. उपयोग : १) काळ्या मनुका रात्री पाण्यात भिजत घालून दुसऱ्या दिवशी सकाळी पाण्यात कुस्करून त्यामध्ये जिरेपूड टाकावी व हे मिश्रण मनुक्यासह हळूहळू प्यावे. यामुळे शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढते व (क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# कॅलिडोस्कोप

## महिलांना पाच दिवसांचा एकांत

भारताच्या प्रत्येक कोपऱ्यात वेगवेगळ्या रूढी आणि परंपरा दिसून येतात. अशाच एका अनोख्या परंपरेची चर्चा हिमाचल प्रदेशातील कुल्लू जिल्ह्यातील पिनी गावाशी संबंधित आहे. या गावात श्रावण महिन्यात पाच दिवस विशेष धार्मिक विधी पार पडतात. हिमाचल प्रदेश राज्यातील कुल्लू जिल्ह्यामधील पिनी गावात दरवर्षी श्रावण महिन्याच्या शेवटच्या काळात पाच दिवसांचा पारंपरिक उत्सव साजरा केला जातो. स्थानिकांच्या मते हा उत्सव त्यांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचा एक म हत्त्वाचा भाग आहे. या कालावधीत गावातील विवाहित महिला काही विशिष्ट धार्मिक नियम ांचे पालन करतात. त्या पाच दिवस घरातच राहतात. एकांत पाळतात आणि बाहेर जाणे टाळतात. पती-पत्नी एकमेकांपासून दूर राहतात. ही प्रथा अत्यंत कडक नियमांनुसार पार पाडली जाते.

या उत्सवाच्या काळात गावातील पुरुषांवरही काही बंधने लागू असतात. या काळात त्यांना मद्यपान, मांसाहार किंवा इतर कोणतेही अपवित्र मानले जाणारे कृत्य करण्यास मनाई असते. स्थानिकांच्या श्रद्धेनुसार, नियम ांचे उल्लंघन केल्यास गावावर संकट येऊ शकते. म्हणूनच संपूर्ण गाव एकत्र येऊन श्रद्धेने आणि शिस्तीने ही परंपरा पाळतो. गावकऱ्यांच्या मते, या नियमांमुळे गावाचे रक्षण होते आणि देवतेची कृपा कायम राहते.

या परंपरेमागे एक पौराणिक कथा सांगितली जाते. स्थानिक मान्यतेनुसार, प्राचीन काळी एका राक्षसाने गावात वारंवार हल्ले केले होते. त्या वेळी गावाचे संरक्षक देवता 'लाहु घोंडा' यांनी त्या राक्षसाचा वध करून गावाचे रक्षण केले. त्या घटनेच्या स्मरणार्थ आणि देवतेच्या सन्मानार्थ ही परंपरा सुरू झाल्याचे सांगितले जाते. आजच्या आधुनिक काळात ही प्रथा अनेकांना वेगळी किंवा आश्चर्यकारक वाटू शकते; मात्र पिनी गावातील लोकांसाठी ही त्यांची ओळख, श्रद्धा आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे.



## एचआरची वागणूक चर्चेत!


नोकरीसाठी घेतल्या जाणाऱ्या मुलाखतीमध्ये पगाराचा विषय हा सुरुवातीलाच चर्चेला येतो. नवीन नोकरी शोधत असताना एचआर बहुतेक वेळा उम ेदवाराला त्याची सध्याची किंवा अपेक्षित सॅलरी किती आहे, असा प्रश्न विचारतात. याच माहितीच्या आधारे कंपनी नवीन पद आणि पगाराचे पॅकेज ठरवत असते. करिअरच्या सुरुवातीला उमेदवाराला योग्य मार्गदर्शन आणि आदरयुक्त वागणूक मिळाली तर त्याचा आत्म विश्वासही वाढतो; मात्र काही वेळा एचआर मॅनेजरचे वागणे इतके निराशाजनक असते, की उमेदवाराला नोकरी मिळण्याऐवजी त्याचा आत्मविश्वासच कमी होतो.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'रेडिट' वर एका यूजरने एचआरसोबत झालेल्या संवादाचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. या पोस्टमध्ये त्याने मुलाखतीदरम्यान पगाराच्या अपेक्षेबाबत झालेली चर्चा कशी वादात बदलली हे सांगितले आहे. त्याच्या अपेक्षित पगाराबद्दल विचारले. हा प्रश्न मुलाखतीत नेहमी विचारला जातो. उमेदवाराने उत्तर देताना आपली आधीची सॅलरी सांगणे पसंत नाही, असे सांगितले; मात्र त्याने याआधीच्या नोकरीत दरमहा सुमारे २६ ते २९ हजार रुपये पगाराची अपेक्षा असल्याचे स्पष्टपणे सांगितले. त्याच्या मते त्याच्या कौशल्य आणि अनुभवाच्या आधारावर ही रक्कम योग्य आहे.

संभाषणाचा सूर अचानक बदलला. 'एचआर'ने कठोर शब्दांत प्रतिक्रिया देत म्हटले, की तुम्ही इतके चांगले नाही, की तुम्हाला इतका पगार दिला जाईल. हे ऐकून उमेदवाराला धक्का बसला आणि त्याला खूप वाईट वाटले. त्याच्या मते हा संवाद व्यावसायिक न राहता वैयक्तिक पातळीवर पोहोचला होता. त्यामुळे त्याने 'एचआर'ला विचारले, की आपण एकमेकांना वैयक्तिकरित्या ओळखतो का? मग तुम्ही कसे ठरवू शकता की मी त्या पगाराचा पात्र नाही?

यानंतर दोघांमध्ये थोडा वादही झाला. 'एचआर'ने आपले म्हणणे योग्य ठरवण्यासाठी मार्केटमध्ये एवढा पगार मिळत नाही असा युक्तिवाद केला; मात्र उमेदवाराने शांतपणे उत्तर देत सांगितले, की मुलाखतीदरम्यान व्यावसायिकता राखणे खूप महत्त्वाचे असते. त्याने पुढे सांगितले, की 'एचआर'ने उमेदवाराशी आदराने वागायचे असते. एखाद्या व्यक्तीची क्षमता किंवा पात्रता तपासण्याचेही व्यावसायिक मार्ग असतात अशा प्रकारे टिप्पणी करणे योग्य नाही.





## रविवारी काम करणे गुन्हा

जगातील अनेक देशांमध्ये रविवारी सुट्टी असते; मात्र काही ठिकाणी हा दिवस केवळ सुट्टीचा नसून धार्मिक परंपरेशीही जोडलेला आहे. प्रशांत महासागरात वसलेला छोटा द्वीपीय देश टोंगा हा अशाच एका कठोर नियमामुळे जगभर चर्चेत आहे. या देशात रविवारी काम करणे कायद्याने गुन्हा मानले जाते.

टोंगा देशाच्या संविधानानुसार रविवार हा पवित्र दिवस मानला जातो. त्यामुळे या दिवशी कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक कामकाज करण्यास परवानगी नसते. दुकान, कार्यालय, व्यावसायिक सेवा किंवा व्यापार यांसारख्या कोणत्याही व्यवसायिक विक्री रविवारी बंद ठेवणे बंधनकारक आहे. एखादी व्यक्ती रविवारी दुकान उघडून व्यवसाय करताना किंवा इतर प्रकारचे काम करताना आढळली, तर तिच्यावर कारवाई केली जाऊ शकते. अशा वेळी त्या व्यक्तीवर दंड आकारला जाऊ शकतो किंवा काही प्रकरणांमध्ये तुरुंगवासाची शिक्षा देखील होऊ शकते.

या नियमाची अंमलबजावणी स्थानिक पोलिस आणि प्रशासनाकडून केली जाते. तसेच नागरिकांनी या नियमाचे पालन करावे अशी सतत आवाहनही केले जाते; पण यामध्ये रुग्णालये, पोलिस सेवा, वीज-पाणी पुरवठा आणि इतर अत्यावश्यक सेवा रविवारी सुरू ठेवण्यास परवानगी आहे. कारण या सेवा बंद ठेवल्यास लोकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ शकतो. टोंगा देशातील बहुतांश लोकसंख्या ख्रिश्चन धर्माचे पालन करते. या धर्मात रविवार हा प्रार्थना, उपासना आणि विश्रांतीसाठी राखीव दिवस मानला जातो. त्यामुळे या धार्मिक परंपरेचा आदर राखण्यासाठीच असा कायदा करण्यात आला आहे.

## हा चहा आहे महाग

आसाममध्ये चहाचे मळे आहेत. इथे विविध प्रकारच्या आणि दर्जाच्या चहाचं उत्पादन केलं जातं. मध्यंतरी 'गोल्ड टी' प्रकारातल्या एक किलो चहासाठी तब्बल ५० हजार रुपये मोजण्यात आले. गोल्ड टी हा चहाचा दुर्मिळ प्रकार आहे. या चहाची चव बराच काळ जिभेवर रेंगाळत रहाते. गेल्या वर्षी या चहाला प्रतिकिलो ३९ हजार इतकी किंमत मिळाली होती. त्याआधी २०१८ मध्ये अरुणाचल प्रदेशातल्या 'डोनी पोलो टी इस्टेट'मधल्या 'गोल्डन निडल' चहाला प्रतिकिलो ४० हजार रुपये किंमत मिळाली होती. त्यामुळे यंदा गोल्ड टीला सर्वाधिक किंमत मिळाली आहे. गोल्ड टीची लागवड खूप कमी प्रमाणात केली जाते. त्याची लागवड करणं सोपं काम नाही.



## मैत्रिणीसाठी लिंगपरिवर्तन

प्रेमात पडलेल्या व्यक्तीला काळ, वेळ, स्थळ कशाचेही भान नसते असं म्हटलं जातं. प्रेमात माणूस वाट्टेल ते करू शकतो. कोणाच्या, कधी प्रेमात पडावं यावरही लोकांचं नियंत्रण नसतं, कोणावरही प्रेम जडू शकतं. एखाद्या महिलेने महिलेशी आणि पुरूषाने पुरूषाशी लग्न केल्याच्या घटनाही हल्ली घडतात. उत्तर प्रदेशच्या मथुरामध्ये एक अशीच वेगळी घटना आहे. तेथे एका मैत्रिणीच्या प्रेमात पडलेल्या तरुणीने तिचं लिंगपरिवर्तनच करून घेतलं. आपली जुनी ओळख पुसून सविता आता ललित बनली आहे. नंतर दोघांनीही पळून जाऊन आर्य समाज मंदिरात जाऊन लग्न केलं आणि आता ते एकत्र रहात आहेत.

जेव्हा जयपूर पोलिस हे पूजा नावाच्या मुलीच्या शोधात मथुरेच्या महावनमध्ये पोहोचले, तेव्हा हा सगळा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी पूजाला परत जयपूरला नेले आणि त्यानंतर ही प्रेमकथा समोर आली. ३१ वर्षीय सविता ही भरतपूरची रहिवासी आहे. एसएससी कोचिंगसाठी ती जयपूरला आली होती. सांगानेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रमेश नावाच्या व्यक्तीच्या घरात ती भाड्याने राहू लागली. रमेशची मुलगी तिच्याच वयाची होती. त्यामुळे दोघींची चांगली मैत्री झाली आणि काही काळातच दोघी एकमेकांच्या जवळ आल्या. कोचिंग संपल्यानंतर सविता भरतपूरला परत गेली; पण त्यानंतरही तिची आणि पूजाची भेट सुरूच राहिली. कालांतराने त्यांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. दोघींनीही एकत्र जगण्याची



आणि मरण्याची शपथ घेतली आणि आयुष्यभर जोडीदार बनून राहण्याचा निर्णय घेतला; मात्र समाजाच्या बंधनांवर मात करण्यासाठी सविताने मोठे पाऊल उचलले आणि लिंग परिवर्तन करून ती सविताची ललित बनली. यानंतर ते दोघेही पती-पत्नी म्हणून एकत्र राहू लागले.


पूजाच्या प्रेमात पडलेल्या सविताने ३१ मे २०२२ रोजी इंदूरमध्ये तिचे लिंग परिवर्तन केलं आणि ती सविताची ललित झाली. यानंतर नोव्हेंबर २०२४ मध्ये सविता आणि पूजाचे आर्य समाज वैदिक संस्थान मंडळ, जयपूर येथे लग्न झाले; पण पूजाने हे गुपित तिच्या घरच्यांपासून लपवून ठेवलं होतं; मात्र त्याच दरम्यान, पूजाच्या वडिलांनी एका मुलासोबत तिचं लग्न ठरवलं; पण हे लग्न टाळण्यासाठी पूजाने आपण बीएड करण्यासाठी भरतपूरला जात असल्याचे वडिलांना सांगितले. १० जानेवारी रोजी पूजाने भरतपूरला पोहोचून तिचा मोबाईल बंद केला. कुटुंबीयांनी मुलीचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला; मात्र तिचा काहीच शोध लागला नाही. त्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी १४ जानेवारी रोजी जयपूरमधील सांगानेर पोलिस ठाण्यात पूजा बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांनी तिचे मोबाईल लोकेशन ट्रॅक केले असता ते मथुरेच्या महावन पोलिस ठाण्याच्या परिसरात सापडले. जयपूर पोलिसांनी तेथे छापा टाकून पूजा आणि ललितला पकडले. अखेर चौकशीत ललितने सांगितले, की तो महावन येथील फार्मसी कॉलेजमध्ये काम करतो आणि पूजा त्याच्यासोबत पत्नी म्हणून राहत आहे. पूजानेही पोलिसांना स्पष्टपणे सांगितले, की तिला ललितसोबतच राहायचे आहे. दोघेही प्रौढ आहेत त्यामुळे पोलिसांनी त्यांना सोडून दिलं.

## कंपनीचा असाही फंडा!

जर एखाद्या कंपनीला मार्केटमध्ये स्वत:ला प्रस्थापित करायचे असेल, तर त्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कर्मचारी कंपनीशी प्रामाणिक असणे. प्रत्येक कंपनी प्रामाणिक कर्मचाऱ्यांचा शोध घेते आणि अनेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना लाच देऊन प्रामाणिक बनवतात. असेच पाऊल एका जपानी कंपनीने उचलले आहे. तीने आपल्या नवीन कर्मचाऱ्यांना आकर्षित करण्यासाठी मोफत अल्कोहोल आणि हँगओव्हर रजा दिली आहे.

मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी या कंपनीने एक वेगळी युक्ती आणली आहे, ज्यामध्ये ओसाकामधील एक लहान आयटी कंपनी अलीकडे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. आता सोशल मीडियावर यूजर्सही कंपनीच्या या निर्णयावर वेगवेगळ्या गोष्टी सांगत आहेत. कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांना मोफत दारू आणि हँगओव्हर रजा देत आहे. कामाच्या दरम्यान दारू पिणे सामान्यतः योग्य मानले जात नाही. कारण दारू प्यायल्यानंतर कोणतीही व्यक्ती शुद्धीत राहत नाही; परंतु ट्रस्ट रिंग कंपनी लिमिटेडच्या बाबतीत असे नाही. ही कंपनी मिडोरीबाशी, ओसाका येथील एक छोटी कंपनी आहे, जी आयटीचे प्रतिनिधित्व करते.

येथे बॉस स्वतः दारू आणतो आणि आपल्या नवीन कर्मचाऱ्यांना सर्व्ह करतो. याशिवाय जर एखाद्या कर्मचाऱ्याने जास्त दारू प्यायली, तर कंपनी त्याला हँगओव्हर रजादेखील देते. याशिवाय कर्मचारी दारूच्या नशेत कामावर उशिरा येऊ शकतात आणि तेही कोणत्याही प्रश्नाशिवाय. 'ऑडिटी सेंट्रल'च्या अहवालानुसार, एका महिला कर्मचाऱ्याने नुकतेच कानसाई टीव्हीला सांगितले, की मी 'हँगओव्हर लीव्ह' युक्ती वापरल्याने मी १२ वाजता कामावर परत जाऊ शकते. आणखी दोन किंवा तीन तास झोपू शकता आणि नंतर स्वच्छ मनाने कामावर परत येऊ शकता. मला वाटते की यामुळे मला अधिक कौशल्य मिळेल.



## अमेरिकन व्ह्लॉगर आयुर्वेदाच्या प्रेमात


अमेरिकन व्ह्लॉगरने भारताच्या आरोग्यसेवा व्यवस्थेचे, आयुर्वेदाचे आणि घरगुती उपायांचे मनापासून कौतुक केले. त्यांचे म्हणणे आहे, की भारतात आजारी पडल्यानंतर उपचारांमुळे ज्या प्रकारे त्यांना आराम मिळाला, तो त्यांच्या दृष्टीने अत्यंत आश्चर्यकारक अनुभव होता. त्यांच्या कौतुकानंतर 'सोशल मीडिया'वर लोक भारतीय आयुर्वे द आणि घरगुती उपचारांची मोठ्या प्रमाणावर चर्चा करत आहेत.

अमेरिकेतील ट्रॅव्हल व्ह्लॉगर चार्ली इव्हान्स सध्या सुमारे चार महिन्यांसाठी भारतात राहत आहेत. त्यांनी आपल्या इंस्टाग्राम खात्यावर एक व्हिडीओ शेअर करत सांगितले, की भारतात असताना ते अचानक आजारी पडले होते. ते म्हणतात, मी अमेरिकेतून आलो आहे आणि मागील १४८ दिवसांपासून भारतात राहतो आहे.

काही आठवड्यांपूर्वी मी राजस्थानमध्ये प्रवास करत असताना मला घशात गंभीर संसर्ग झाला. मला वाटले, की कदाचित मला 'स्ट्रेप थ्रोट' झाला असावा. सुरुवातीला त्यांनी रुग्णालयात जाणे टाळण्याचा प्रयत्न केला; मात्र नंतर त्यांना जाणवले, की हा निर्णय चुकीचा होता.

यानंतर व्ह्लॉगरने सांगितले, की ते ऋषिकेश येथे पोहोचले तेव्हा त्यांनी रुग्णालयात जाऊन उपचार करून घेतले. त्यांच्या मते भारतात रुग्णालयात उपचार घेणे त्यांना खूप सोपे वाटले. चार्ली यांनी व्हिडीओमध्ये काही औषधे आणि आयुर्वेदिक उत्पादनेही दाखवली. त्यांनी सांगितले, की त्यांना फार्मसीमधून योगी कंठिका नावाच्या आयुर्वेदिक गोळ्या मिळाल्या. घशाच्या त्रासासाठी त्या अत्यंत फायदेशीर ठरल्या.

याशिवाय त्यांनी स्थानिक कफ ड्रॉप्स आणि हर्बल बामचेही कौतुक केले. त्यांच्या एका भारतीय मित्राने त्यांना एक हर्बल बाम दिला, ज्याला त्यांनी नैसर्गिक विक्ससारखा असल्याचे वर्णन केले.




## घुबडाला युवकामुळे जीवदान

पुणे येथील रहिवासी अमित खैरनार आपल्या दैनंदिन कामात व्यस्त होते. त्याचवेळी त्यांची नजर एका वीजेच्या खांबावर गेली. त्यांना एक घुबड पतंगाच्या दोरीत अडकल्याचे दिसले. त्याचे पंख अर्धवट पसरलेले होते आणि तो विजेच्या तारांच्या अत्यंत जवळ तडफडत होता. ही परिस्थिती अत्यंत धोकादायक होती. थोडी चूक झाली असती तरी त्याचा जीव जाऊ शकला असता.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी तत्काळ स्थानिक अग्निशमन विभागाला बोलावले. अग्निशमन दलाचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि धोकादायक परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी बचावकार्य सुरू केले.

घुबड खूप उंचीवर अडकलेले होते आणि विजेच्या तारांमध्ये गुंतल्यामुळे हे 'रेस्क्यू ऑपरेशन' अत्यंत धोकादायक होते. सुरुवातीला शिडी पुरेशी उंच नसल्यामुळे पथकाला अडचणींचा सामना करावा लागला. अनेक प्रयत्नांनंतर एका अग्निशमन कर्मचाऱ्याने पक्ष्यापर्यंत पोहोचण्यासाठी लांब लाकडी काठीच्या मदतीने केबल लाईन थोडी खाली आणली.



घुबडापर्यंत पोहोचल्यानंतर अत्यंत काळजीपूर्वक चाकूच्या साहाय्याने पतंगाची दोरी कापून त्याला मुक्त केले. मोकळे होताच घाबरलेले घुबड उडण्याचा प्रयत्न करू लागले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी त्याला सुरक्षितरीत्या पकडले. त्याला आणखी इजा होऊ नये आणि खबरदारी म्हणून तपासणीसाठी त्याला पशुवैद्याकडे पाठवण्यात आले. अमित यांनी बचाव पथकाचे त्यांच्या तात्काळ प्रतिसाद आणि संवेदनशीलतेबद्दल आभार मानले.

## त्यांनी पाळली सुसर

अमेरिकेतल्या पेंसिलवेनियाचे रहिवासी जोए हेनी यांच्याकडे पाळीव सुसर आहे. ती जोए यांच्या काळजाचा तुकडा आहे. 'वॅली' असं या सुसरीचं नाव असून तिच्यामुळे जोए नैराश्यातून बाहेर पडले. ६५ वर्षांचे जोए वॅलीमुळे तणावमुक्त आयुष्य जगत आहेत. या सुसरीला आपल्यासोबत ठेवण्यासाठी त्यांनी डॉक्टरांची मदत घेतली. शिवाय 'इमोशनल सपोर्ट ॲनिमल' म्हणून तिची नोंदणीही करून घेतली आहे. पाच फूट लांबीची ही सुसर चक्क मांजरांनाही घाबरते. जोए आजारी पडल्यावर सरपटत त्यांच्या जवळ जाते. आपल्यावर सर्वांनी प्रेम करावं असं वॅलीला वाटतं. तिला जोएला मिठी मारायला खूप आवडतं. वॅली ही सुसर चार वर्षांची आहे.



वॅली काही वर्षांनी १६ फुटांची होईल. मात्र जोए यांना याबाबत काळजी वाटत नाही. जोए यांनी वॅलीला मृत्यूच्या दाढेतून वाचवलं होतं. जोए वॅलीला घेऊन बागेत आणि खरेदीलाही जातात. सुसरीला बघून लोक खूप घाबरतात. वॅली काहीच करत नसल्याचं सांगावं लागतं.

# प्रज्ञाशोध परीक्षेत डी.पॉलच्या श्रद्धा हिंगे व श्रुती हिंगेचे यश

श्रीरामपूर – येथील ध्येय तरंग एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत फेब्रुवारीमध्ये नुकत्याच घेण्यात आलेल्या आय एम विनर राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत श्रीरामपूर येथील विन्सेन्शन मिशन सर्विस सोसायटी संचलित डी. पॉल इंग्लिश मिडीयम





हायस्कूलच्या विद्यार्थिनी कु.श्रद्धा सचिन हिंगे (इ.नववी) हिने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर कु.श्रुती सचिन हिंगे (इ.चौथी) हिने जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवला.

या भगिनींचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांनी पुन्हा एकदा डिपॉल स्टेट बोर्ड स्कूलच्या शिरपेच्यात मानाचा तुरा खोवला आहे व संस्थेचे नाव राज्यस्तरावर पोहोचविले आहे. यावेळी त्यांना आई–वडील व सर्वच शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल त्यांचे श्रीरामपूर डिपॉल शाखेचे व्यवस्थापक फादर सिजो, प्रशासक फा.फ्रँको, प्राचार्या सिस्टर ब्लेसा, सचिव मॉली कुथूर, वरिष्ठ लिपीक रवींद्र लोंढे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

# रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद पाहणे हेच आमचे खरे समाधान

### मनीषा मुनोत यांचे प्रतिपादन; आनंदऋषी हॉस्पिटल आयोजित मोफत ईएनटी तपासणी शिबिरात ६६ रुग्णांनी घेतला लाभ



श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित मोफत विविध रोग तपासणी शिबिरांच्या मालिकेत कान, नाक व घसा (ईएनटी) तपासणी शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.

नगर – रुग्ण जेव्हा हॉस्पिटल–मध्ये येतात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर वेदना, चिंता आणि अस्वस्थता असते. मात्र येथे त्यांना योग्य निदान, वेळेवर उपचार आणि मानवी स्पर्श मिळाल्यानंतर ते हसतमुखाने परत जातात. हाच आमच्यासाठी सर्वात मोठा समाधानाचा क्षण असतो. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून अशा मोफत शिबिरांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक गरजू रुग्णापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवणे हेच आमचे ध्येय असून पुढील काळातही असे उपक्रम सातत्याने राबवले जातील, असे आयोजक मनीषा मुनोत यांनी भावनिक शब्दांत सांगितले. पुढे त्या म्हणाल्या की, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत लोक आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. लहानसहान त्रास मोठ्या आजाराचे रूप घेईपर्यंत दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे अशा तपासणी शिबिरांमुळे आजाराचे वेळेत निदान होऊन गंभीर परिणाम टाळता येतात. समाजातील प्रत्येक घटकाला परवडणारी व सुलभ आरोग्य सेवा मिळावी यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत विविध रोग तपासणी शिबिरांच्या मालिकेत कान, नाक व घसा (ईएनटी) तपासणी शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. या शिबिरामध्ये नागरिकांनी सहभाग नोंदवत तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेतला. सकाळपासूनच रुग्णांची गर्दी दिसून येत होती.

या शिबिराचे उद्घाटन आयोजक दिलीप मुनोत, ललित मुनोत, मदन मुनोत, प्रीतम मुनोत, प्रणव मुनोत, चंदनबाला मुनोत, अनिता मुनोत, मनीषा मुनोत, प्रियांका मुनोत, प्रिया मुनोत, हिंदान मुनोत एवं मुनोत परिवार तसेच श्री पूजन इन्फ्रा अँड डेव्हलपर्स, अहिल्यानगर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या प्रसंगी डॉ. अतुल तुपे, डॉ. सुकेशनी गाडेकर, डॉ. अझर शेख, डॉ. सुरज कर्डीले, संतोष बोथरा, डॉ. आशिष भंडारी, सुभाष मुनोत, मानकचंद कटारिया, प्रकाश छल्लाणी उपस्थित होते.

यावेळी डॉ. अतुल तुपे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कान, नाक आणि घसा यांसारख्या अवयवांचे आजार अनेकदा सुरुवातीला किरकोळ वाटतात, मात्र दुर्लक्ष केल्यास ते गंभीर होऊ शकतात. वेळेवर तपासणी आणि योग्य उपचार केल्यास मोठ्या शस्त्रक्रिया किंवा गुंतागुंती टाळता येतात. त्यामुळे नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणी करण्याची सवय लावावी. ते पुढे म्हणाले की, ही सेवा केवळ वैद्यकीयच नव्हे तर मानवतेची सेवा आहे. त्यांनी नागरिकांना आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे व वेळोवेळी तपासणी करून घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी प्रभावीपणे केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले. या शिबिरामध्ये एकूण ६६ रुग्णांनी तपासणी व उपचाराचा लाभ घेतला. तज्ज्ञ डॉक्टरांनी प्रत्येक रुग्णाची सखोल तपासणी करून आवश्यक ते मार्गदर्शन व औषधोपचार सुचवले.

# आनंददरीत घुमला ‘सेतू बांधा रे सागरी’चा गजर

### श्रीरामनवमी व ट्रेकॅम्पच्या वर्धापनदिनानिमित्त रंगला भरतनाट्यम नृत्याविष्कार



श्रीरामनवमी व ट्रेकॅम्पच्या वर्धापनदिनानिमित्त आनंदरीत भरतनाट्यम नृत्याविष्कार रंगला.

नगर – प्रभू श्रीरामांच्या वास्तवाने पावन झालेल्या भूमीतील डोंगर–दरीचा परिसर... कानावर पडणारा श्रीरामस्तुतीची गीते... त्या गीतांवर भल्या सकाळी भरतनाट्यमचा नृत्याविष्कार करणाऱ्या तरुणी... आणि या सुमधूर कलाविष्काराला दाद देणारे शेकडो निसर्गप्रेमी... अशा भारावलेल्या वातावरणात नगरजवळील डोंगरगणच्या आनंददरीचा परिसर पूर्णपणे भारावून गेला होता... श्रीरामनवमी आणि ट्रेकॅम्प गिर्यारोहण संस्थेच्या १३ व्या वर्धापनदिनिमित्त आयोजित आनंददरी येथील ट्रेकने पर्यटकांना अनोखी सांगितिक मेजवाणी मिळाली.

नगरमधील मानसोपचार तज्ज्ञ असलेल्या विशाल लाहोटी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ट्रेकॅम्प संस्थेला १३ वर्षे पूर्ण झाली. सह्याद्रीच्या डोंगररांगांतील अनेक गडकिल्ले, पर्यटनस्थळांवर जाऊन निसर्गाचा आनंद घेण्याच्या सवयीतून या संस्थेचा जन्म झाला. हजारो नगरकरांना या संस्थेने ट्रेकची सवय लावली. या संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त श्रीरामनवमीचे औचित्य साधून श्रीरामांचे वास्तव्य असलेल्या डोंगरगण परिसरातील आनंददरी येथे ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. नगरमधून सुमारे ३०० पर्यटक भल्या पहाटे वांबोरी घाटाखालील गणपती मंदिराजवळ पोहोचले. तेथून डोंगर–दरीतून चालत आनंददरीतील तलावाजवळ पोहोचले. तेथे पोहोचल्यानंतर या सर्व निसर्गप्रेमींना सुखद धक्का बसला. तेथे तलावाच्या काठी पारंपारिक वेशभूषेत श्रीरामप्रभूंच्या स्तुतीच्या गीतांवर भरतनाट्यमच्या नृत्याविष्काराने उपस्थितांना अवाक् केले. तलाव, मागे डोंगर, झाडंझुडपं अशा निसर्गरम्य परिसरात सुरेखा डावरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंजली नृत्यलयाच्या संस्कृती धुमाळ, अस्मिता दोडे, श्रुती ढोकणे, अस्मी चावक आणि करिश्मा कोठारी–जोशी यांनी अतिशय सुंदर पद्धतीने गीत रामायणातील ‘सेतू बांधा रे सागरी’ तसेच ‘रामाष्टकम, ‘रामरक्षा स्तोत्र’ यावर मनमोहक नृत्य सादर केले. नृत्यविशारद पदवीधारक करिश्मा कोठारी–जोशी हिने लतादीदींच्या आवाजातील वात्सल्य भावातील ‘ठुमक चलत रामचंद्र...’ यावर भावपूर्ण नृत्य सादरीकरण केले. टाळ्यांच्या कडकडाट व जय श्रीरामच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता. लक्ष्मणाचं पात्र प्रतिभा महामिने यांनी साकारले. हनुमानाच्या भूमिकेत शौर्य कुटे आणि वानर वेषभूषेतील ६ वर्षांच्या पिहू जोशी हिने आपापली जबाबदारी उत्कष्टपणे पार पाडली. या पात्रांमुळे कार्यक्रमात रंगत आणली. आलेल्या सर्वांनी याचा मनापासून आस्वाद घेतला. नंतर सर्वांनी या कलाकारांबरोबर फोटो काढले. चुलीवरची कॉफी आणि भेळचा आस्वाद घेऊन ट्रेकची सांगता झाली. डोंगरगण येथे श्रीरामांचे वास्तव्य होते. अशा पावन भूमीत श्रीरामनवमीच्या निमित्ताने भल्या पहाटे अंजली नृत्यालयाच्या उत्साही कलाकारांनी ट्रेकमध्ये सादर केलेला भरतनाट्यम् नृत्याविष्कार उपस्थित पर्यटकांना भावला. ट्रेकॅम्प नेहमीच कला, संस्कृतीचे पावित्र्य जतन व पर्यटनातून निसर्ग संवर्धन यासाठी गेल्या १३ वर्षांपासून कार्यरत आहे, असे ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी म्हणाले.

# गुणवत्तेसाठी योग्य मार्गदर्शन आणि प्रामाणिक प्रयत्न गरजेचे

### मुख्याध्यापिका शारदा पोखरकर यांचे प्रतिपादन, ड्रीमअप अॅकडमीच्या शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण




ड्रीमअप एज्युकेशन अॅकडमीतर्फे शालेय स्तरावर चौथी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ पार पाडला.

नगर – आजच्या धावत्या युगात गुणवत्तेला कमालीचे महत्त्व आहे. गुणवत्ता मिळवायची असेल तर शैक्षणिक मार्गदर्शनही त्याच तोलामोलाचे हवे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमीत कमी करावा. स्पर्धा परीक्षांमधून अनेक उच्चपदस्थ संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व प्रामाणिक प्रयत्न करावेत, असे आवाहन आनंद विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर यांनी केले.

गुलमोहर रस्त्यावरील ड्रीमअप एज्युकेशन अॅक्डमीतर्फे शालेय स्तरावर चौथी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ नुकताच पार पाडला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मुख्याध्यापिका पोखरकर बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून एक्सपर्ट कॉम्प्युटर्सचे संचालक प्रशांत दरे, अॅक्डमीच्या संचालिका प्रतिक्षा आव्हाड व मयुरी झालटे आदी उपस्थित होते.

अॅक्डमीतर्फे मागील आठवड्यात इयत्तेनुसार परीक्षा घेण्यात आली होती. परिक्षणानंतर प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. त्यानुसार बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना ट्रॉफी व बक्षीसाचे वितरण करण्यात आले. बक्षीस वितरणाचे निवेदन संचालिका मयुरी झालटे यांनी केले. बक्षीस वितरणानंतर सर्वांना अल्पोपहार देण्यात आला. मुख्याध्यापिका पोखरकर यांचा सत्कार आव्हाड व झालटे यांनी रोपे देऊन केला. या वेळी विद्यार्थ्यांसह पालक उपस्थित होते.

बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे ड्रीमअप अॅक्डमीतर्फे अभिनंदन करण्यात आले. सूत्रसंचालन आर्या बढदे या विद्यार्थिनीने अतिशय सुंदररित्या केले.

संचालिका प्रतिक्षा आव्हाड यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.



हॉटेल ‘न्यू बंधूप्रेम’चा शुभारंभ गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर करण्यात आला. याप्रसंगी वडझीरकर परिवार.

# हॉटेल ‘न्यू बंधूप्रेम’चा शुभारंभ

नगर – नगरच्या मध्यवर्ती चितळे रोडवर जिल्हा वाचनालय परिसरातील मागील ४० वर्षांपासून गरमागरम गोल भजे, वडापाव, जिलेबी, रगडा वडाच्या माध्यमातून वडझीरकर बंधू स्वाद सेवा देत आहेत. ग्राहकांचे उदंड प्रेम आणि पाठबळामुळे आता वडझीरकर बंधू यांनी चितळे रोडवरच नव्या रूपात हॉटेल न्यू बंधूप्रेम व्हेज–नॉनव्हेज या रूचकर स्वाद सेवा देणाऱ्या हॉटेलचा गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर शुभारंभ केला आहे. वडझीरकर परिवारातील आई व काकू यांच्या हस्ते या हॉटेलचा शुभारंभ झाला. गोविंदराव वडझीरकर यांच्या वाढदिवसानिमित्त आणि बाळासाहेब वझझीकर यांच्या आशीर्वादाने वडझीरकर परिवाराने ही नवीन स्वाद सेवा सुरू केली आहे.

वडझीरकर बंधू यांची मराठमोठी स्वाद सेवा खवय्यांच्या पसंतीस उतरली आहे. उत्कृष्ट चव व गुणवत्ता देत या बंधूंनी हॉटेल व्यवसायात मोठी झेप घेतली आहे. नव्या रूपातील न्यू बंधूप्रेम हॉटेलमध्येही तोच अस्सल व्हेज नॉनव्हेज जेवणाचा आनंद ग्राहकांना मिळत आहे. व्हेज आणि नॉनव्हेजचा रसनातृप्तीचा आनंद देणारा मेन्यू याठिकाणी आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने ग्राहकांचीही चांगली सोय झाली आहे. वडझीरकर यांना कैलास उडपी, महेंद्र पेढेवाला यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# समर्थ प्रशालेत विद्यार्थ्यांनीच नियोजन करून पार पाडला मराठी भाषा गौरव दिन सप्ताह

### बालकांनी दर्शवला इव्हेंट मॅनेजमेंटचा अनोखा वस्तूपाठ




श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत मराठी भाषा गौरव दिन सप्ताहाचा समारोप साजरा झाला. याप्रसंगी प्रशालेचे शालेय समिती चेअरमन अॅड. किशोर देशपांडे, प्राचार्या वसुधा जोशी, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी आदी.

नगर – सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत नुकताच जागतिक मराठी भाषा गौरव दिन सप्ताहाचा समारोप साजरा झाला. यामध्ये विद्यार्थ्यांनीच संपूर्ण कार्यक्रमाचे आखीव रेखीव नियोजन केले. इयत्ता पाचवी ते नववीच्या कुशल विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन, कविता सादरीकरण, प्रास्ताविक, अध्यक्ष सूचना, अनुमोदन, नाटिका–निर्मिती दिग्दर्शन लेखन सादरीकरण, भाषण, वादविवाद, मराठी गीत सादरीकरण, फलक लेखन, कार्यक्रम पत्रिका, निर्मिती, स्वागतगीत– गायन– वादन, पुस्तक परीक्षण, नृत्य सादरीकरण, पसायदान गायन, रांगोळी रेखाटन, कागदी फुलांची बुके निर्मिती आदी सर्व घटकांचे नियोजन विद्यार्थ्यांनीच करून कार्यक्रम घडवून आणला व शिक्षण क्षेत्रामध्ये इव्हेंट मॅनेजमेंटचा जणू अनोखा वस्तूपाठ निर्माण केला.

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारिणी सदस्य तथा प्रशालेचे शालेय समिती चेअरमन अॅड. किशोर देशपांडे, प्राचार्या वसुधा जोशी, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी उपस्थित होते.

सूत्रसंचालन कु. हर्ष अत्रे, कविता सादरीकरण कु. गौरवी उमराणे, कु. राजश्री वंगार, कु.स्वामिनी कुलकर्णी, एक मराठी माणूस या बालनाटिकेच्या सादरीकरणामध्ये पार्थ जरे, साईराज सरडे, अक्षरा छाजेड, श्रीशा अकडकर, मानसी वाघमारे, शौर्य थोरात, संस्कृती आगरकर यांनी सहभाग घेतला.

अॅड. देशपांडे म्हणाले की,आपला मराठी भाषा गौरव दिन जणू रोजच असतो, शालेय वयापासून प्रौढ वयात जोपर्यंत माणूस शिकत आहे, तोपर्यंत त्याच्या मराठी शब्द संग्रहामध्ये दररोज किमान पाच तरी नवीन शब्दांची भर पडते, म्हणून त्याचे व्यक्तिमत्व समृद्ध होत असते. सर्व प्रकारच्या भावभावना, तसेच विविध प्रकारचे रस आपण जेवढे मराठी भाषेतून व्यक्त करू शकतो तेवढी व्याप्ती इतर भाषांमध्ये नाही.

कु. भार्गवी गोसावी, चि.श्रेयस पालवे, वृंदा घोडे, स्वरा देशपांडे, अनुष्का आगळे, आराध्या पतंगे, श्रीनिधी लंके, वैभवी रेपे यांनी कविता सादरीकरण व मराठी भाषा भाषण सादरीकरणात सहभाग घेतला. श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या समग्र मराठी साहित्य संपदेची माहिती देणारे सेल्फी पॉइंट कार्यक्रमस्थळी लावण्यात आले होते. शिक्षक डॉ.अमोल बागुल यांनी श्री समर्थ रामदास व मराठी भाषा यांचा अनमोल संबंध, शिक्षिका सौ बोठे यांनी माय मराठी माझी, शिक्षक श्री. राशिनकर यांनी मराठी भाषा गौरव दिन का साजरा केला जातो? या विषयावर व्याख्यान दिले तर शिक्षिका सौ. पूरकर यांनी मराठी भाषा गौरव दिनाची कविता सादर केली. शिक्षक वसंत गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना विविध सूचना व मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सौ.वसुधा जोशी यांनी केले. सौ. नारळे यांनी आभार मानले.

# जागतिक व राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा डंका



जागतिक व राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी यश मिळविल्याबद्दल डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नगर – नुकत्याच जागतिक स्तरावर, राज्यस्तरावर व विभागीय स्तरावर झालेल्या विविध कौशल्य स्पर्धांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. जागतिक कौशल्य स्पर्धेत जामखेडचा विद्यार्थी अंकुश ज्ञानदेव सुपेकर हा विभागीय जागतिक स्पर्धेत उपविजेता ठरला असून रु.७५,००० रोख पारितोषिक व सिल्वर मेडलने गौरविण्यात आले आहे. याशिवाय अन्य स्पर्धांमध्ये लोकपंचायत रुरल टेक्निकल इन्स्टिट्यूट व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रीगोंदा या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

या विद्यार्थ्यांचा सत्कार जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हा कौशल्य समितीचे सदस्य विनायक देशमुख, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, कौशल्य विभागाचे प्रभारी सहा. आयुक्त रवी कुमार पंतम, आय.टी.आय. चे प्राचार्य एस.व्ही.जाधव उपस्थित होते.

नुकत्याच हैदराबाद येथे झालेल्या विभागीय जागतिक कौशल्य स्पर्धेमध्ये जामखेड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा विजतंत्री या व्यवसायाचा प्रशिक्षणार्थी अंकुश ज्ञानदेव सुपेकर हा पश्चिम विभागाच्या जागतिक कौशल्य स्पर्धेमध्ये एअरक्राफ्ट मेंटेनन्स या कौशल्य प्रकारात उपविजेता ठरला आहे. त्याला रोख बक्षीस रुपये ७५००० व सिल्वर मेडलने गौरविण्यात आले. हा विद्यार्थी पुढील राष्ट्रीय स्पर्धे करता आता पात्र ठरला असून त्याने एक वर्ष हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड येथे शिकाऊ उमेदवारी केली आहे.

याशिवाय विभागीय डिपेक्स २०२६ या तंत्र प्रदर्शनामध्ये लोकपंचायत ग्रामीण तंत्र प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सोलर पावर सायकल फवारणी यंत्र या प्रकल्पाला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार मिळाला आहे. या प्रकल्पाने जायंट मीटर वेव्ह रेडिओ टेलीस्कोप तथा (जी.एम.आर.टी.), खोडद येथे आयोजित टेक्निकल सायन्स एक्झिबिशन मध्ये प्रथम क्रमांक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सृजन व कौशल्य विकास रोजगार व नाविन्यता विभाग तसेच एमआयटी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय तंत्र प्रदर्शन यामध्ये श्रीगोंदा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी नॉन इंजिनिअरिंग गटातून प्रथम क्रमांक पटकाविला असून त्यांनी स्पर्धेमध्ये हॅन्ड क्राफ्ट वर्क बाबत प्रकल्प सादर केला होता.

# ‘मराठा सोयरीक संस्थे’तर्फे नाशिक, नगर व पुणे जिल्ह्यात मोफत आधुनिक वधु वर मेळावे

नगर – जगदंब फाउंडेशन संचलित मराठा सोयरीक संस्थेचे नेहमीप्रमाणे नाशिक, नगर व पुणे जिल्ह्यात मोफत वधू वर मेळावे आयोजित करण्यात आलेले आहेत. अखिल भारतीय मराठा महासंघ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक शहरात गंगापूर रोड येथे रावसाहेब थोरात सभागृहात २९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता १०५ वा मोफत मेळावा आहे.

१०६ वा मोफत वधू वर मेळावा राहाता तालुक्यात लोणी येथे वरद विनायक सांस्कृतिक भवनात ३१ मार्च रोजी सकाळी ११ वाजता तर १०७ वा मेळावा शिरूर तालुका मित्र परिवार पुणेच्या मदतीने पुण्यात चंदननगर मध्ये एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात होणार असल्याची माहिती जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे पाटील व संस्थेच्या संचालिका जयश्री अशोक कुटे यांनी दिली आहे. राहाता तालुक्यातील मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून सौ.शालिनीताई विखे व ह. भ.प. उद्धव महाराज मंडलिक हे असणार आहेत.

मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या मुली स्वतः हजर असतील त्या मुलींना मोफत स्थळे संस्थेकडून सुचवले जातील. तसेच मेळाव्यात स्क्रीनवर मुला–मुलींचे चांगले फोटो बायोडाटा दाखवले जातील. अधिक माहितीसाठी ७०२०२८१२८२ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन अ. भा. मराठा महासंघ नाशिकचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बनकर, नगरसेवक प्रवीण जाधव, नगरसेवक सागर लामखेडे, अॅड. गौरव गाजरे, योगेश पाटील, वैभव वडजे, बाळा पऱ्हाड, राहाता तालुक्यातील प्रकाश जोंधळे, संदीप गावडे, माणिक धनवटे, सचिन निर्मळ, वसंत पाटील, जयराम धांडे, नानासाहेब दानवे यांनी केले आहे.

मराठा सोयरीक संस्था ही महाराष्ट्रातील नामांकित अशी विवाह संस्था आहे, मेळाव्यात येताना वधू–वरांनी बायोडाटा आधार कार्ड झेरॉक्स घेऊन पालकांसह हजर राहणं बंधनकारक आहे. जे मेळाव्याला येऊ शकत नाही त्यांनी दिलेल्या नंबरवर संपर्क करून स्थळांची माहिती घेऊ शकता, असे संस्थेच्यावतीने सांगण्यात आले आहे.

# राम नवमी : आदर्शांची 'मर्यादा' आणि समाजशिल्पी 'रामा'चा शोध



भारतीय संस्कृतीतील सण आणि उत्सव हे केवळ कालमापनाचे टप्पे नसून, ते मानवी जीवनाला संस्कारित करणारे दीपस्तंभ आहेत. चैत्र शुद्ध नवमी, म्हणजेच 'राम नवमी'. हा दिवस आपण प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव म्हणून साजरा करतो. मात्र, आजच्या कोलाहलाच्या आणि बदलत्या सामाजिक मानसिकतेच्या काळात हा उत्सव केवळ मिरवणुका, गुलाल आणि घोषणांपुरता मर्यादित राहायला नको. तो मानवी मनातील 'राम' जागा करण्याचा आणि विखुरलेल्या समाजाला 'रामराज्या'च्या सूत्रात गुंफण्याचा एक वैचारिक 'जागर' ठरायला हवा.

### मर्यादा पुरुषोत्तम : चिरंतन मूल्यांचा वस्तुपाठ

श्रीरामांना आपण 'मर्यादा पुरुषोत्तम' या उपाधीने गौरवतो. 'मर्यादा' म्हणजे जगण्याचे नियम आणि 'पुरुषोत्तम' म्हणजे मानवांमध्ये श्रेष्ठ. श्रीरामांचे संपूर्ण जीवन संघर्षाने व्यापलेले होते, तरीही त्यांनी कधीही आपल्या नैतिक मूल्यांशी तडजोड केली नाही. आजच्या 'इन्स्टंट' युगात, जिथे यश मिळवण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची वृत्ती वाढत आहे, तिथे रामाचा 'संयम' आणि 'कर्तव्यदक्षता' आपल्याला नवी दिशा देऊ शकते. पित्याच्या वचनासाठी राजवैभवाचा क्षणात त्याग करणारा पुत्र, शबरीची उष्टी बोरे आनंदाने खाणारा समतावादी लोकनेता आणि रावणासारख्या बलाढ्य शत्रूचा पराभव करूनही त्याच्या विद्वत्तेचा आदर करणारा योद्धा, असे रामाचे बहुआयामी व्यक्तिमत्व प्रत्येक युगात मार्गदर्शक आहे.

### समाज एकीकरण: समरसतेचे 'रामराज्य'

'रामराज्य' ही संकल्पना केवळ राजकीय सत्तापालट नाही, तर ती सामाजिक समरसतेचा सर्वोच्च बिंदू आहे. रामायणात प्रभू रामाने वानरसेना, केवट आणि शबरी अशा समाजातील उपेक्षित घटकांना एकत्र आणून अन्यायाविरुद्ध लढा दिला. आज आपल्याला समाज एकीकरणासाठी अशाच 'रामरूपी' सर्वसमावेशक विचारांची गरज आहे.

### समाज एकीकरणासाठी आपण काही विधायक पावले उचलू शकतो

✻ **समरसता सहभोजन :** गावागावात जाती-पातीचे तट तोडून सर्वांनी एकत्र येऊन 'प्रसाद' ग्रहण करावा. जेव्हा आपण एकत्र अन्न घेतो, तेव्हा मनातील भेदाभेद नष्ट व्हायला सुरुवात होते.

✻ **सेवा यज्ञ :** उत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याचे उपक्रम राबवावेत. समाजातील वंचितांना मुख्य प्रवाहात आणणे हीच खरी रामभक्ती ठरेल.

✻ **ग्राम स्वच्छता व पर्यावरण रक्षण :** 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना राबवून आपण आपल्या परिसराचा कायापालट करू शकतो. निसर्गाचे रक्षण हेच रामाचे खरे पूजन आहे.

### मानवी मनात 'राम' निर्माण कसा होईल?

संत तुकाराम महाराज म्हणतात, देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर. आपल्या देहातील राम जागा करणे म्हणजे आपल्यातील सद्विवेकाची जोपासना करणे होय.

**१. वाचेचा गोडवा :** प्रभू रामांच्या वाणीत कधीही कटुता नव्हती. आपणही इतरांशी बोलताना 'मृदुता' आणि 'सन्मान' राखला, तर निम्मी सामाजिक भांडणे संपुष्टात येतील.

**२. अहंकाराचा रावण जाळा :** रावण विद्वान होता, पण त्याच्या अहंकाराने त्याचा सर्वनाश केला. आपल्या मनातील 'मी-पणा' आणि गर्व जेव्हा आपण त्यागू, तेव्हाच तिथे रामाचा अधिवास होईल.

**३. सत्याची कास :** कितीही कठीण प्रसंग आले तरी सत्याच्या मार्गावरून ढळू नये, ही रामाची शिकवण आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे.

**४. संयम हाच यशाचा मंत्र :** वनवासात असतानाही रामाने कधीही परिस्थितीबद्दल तक्रार केली नाही. हाच 'संयम' आजच्या पिढीने आत्मसात करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष : राम नवमीचा हा उत्सव आपल्याला एक सुसंस्कृत समाज घडवण्याची सुवर्णसंधी देतो. जेव्हा आपण एकमेकांकडे आदराने पाहू, संकटाच्या काळात शेजाऱ्याचा आधार बनू आणि समाजातील शेवटच्या माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसू, तेव्हाच आपल्या मनात खऱ्या अर्थाने रामाचा जन्म होईल. चला, या राम नवमीला आपण सर्वजण मिळून द्वेष, मत्सर आणि भेदभावाचा त्याग करूया आणि 'माणुसकी'चा धर्म जोपासूया.

मना मनात राम, घरा घरात राम!

**- अमोल बबन भंडारी**
पदवीधर शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनोशी, ता. पाथर्डी

# प्रेरणादायी अक्षरधन

## ब्रह्मविद्या ओविया गावो

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

ज्ञानेश्वर माउली हे जसे आत्मानुभवीसंतश्रेष्ठतसेचअभिजात कवी. मात्र त्यांनी आपली काव्य स्फूर्ती विश्वात्मक देवाचे वर्णन करून धर्मसंकीर्तन करण्यात खर्ची केली. वेदांतासारखा अवघड विषय सरळ काव्य स्वरुपात मांडला. ज्ञानेश्वर माउली म्हणतात,

'तैसी ब्रह्मविद्यारावो ।
सकळ शास्त्रांचा विसंवता ठावो ।
ब्रह्मविद्या ओविया गावो।
ऐसे केले।।'

भगवद्गीता हा ब्रह्मविद्येचा राजा आहे. गीता प्राकृत ओवी छंदात गाऊन सर्वसामान्यांपर्यंत न्यावी. हा प्रपंच माझ्या गुरुंनी माझ्याकडून करून घेतला आहे. ज्ञानेश्वरीच्या अंतरंगात डोकावणाऱ्याला ज्ञानेश्वरीच्या वेगवेगळ्या पैलूंचे दर्शन घडते.

कुणी ज्ञानेश्वरीतील सिद्धांत आणि विषय प्रतिपादनाची रम्य शैली पाहून डोलेल. कोणी भाषागौरव, उपमा दृष्टांत आणि अलौकिक प्रतिमा पाहून नाचेल, कोणी दृष्टांतद्वारा माउलींनी व्यक्त केलेले व्यवहारज्ञान पाहून चकित होईल, कोणी कर्म, ज्ञान, भक्ती, विवेक, योग यांच्या चिंतनाने आनंदी होईल. ज्ञानेश्वरीचे अंतरंग संतसज्जनांना सुखावेल, शब्दसौष्ठव रसिकांना रमवेल, तत्त्वबोधाने तत्त्वज्ञ तर नीतिबोधाने सामान्यजनही ज्ञानदेवांच्या ठायी नम्र होतील.

शब्दही गोड आणि अर्थही गोड.
माझ्या मऱ्हाटाचि बोलू कवतुके ।
परि अमृताचेही पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।।

आपल्या रसाळ प्राकृत वाणीने अमृतालाही जिंकेल असा आत्मविश्वास माउली व्यक्त करतात. ज्ञानेश्वरीमागील भूमिका स्पष्ट करताना माउली म्हणतात, 'जीवाला आनंद साम्राज्याचे सम्राट करण्याचे सामर्थ्य ब्रह्मविद्येत आहे पण ही ब्रह्मविद्या संस्कृत भाषेमुळे सामान्यांपासून दुरावली. या ब्रह्मरसाचा आस्वाद सामान्यांना घडविल्याशिवाय तत्त्वबोधाचे प्रबोधन कसे होणार? त्यासाठी त्यांना समजणारी भाषा आणि पेलणारे तत्त्व सांगणे गरजेचे आहे.

तीरे संस्कृताची गहने।
तोडोनी मऱ्हाठिया शब्दसोपाने ।
रचिली धर्मानिधाने । निवृत्ती देवे ।।

माझे गुरु श्री निवृत्तीनाथ यांनी श्रीगीताचिद्गंगेच्या काठावरचे संस्कृत भाषेचे दाट अरण्य तोडून कोणालाही या गंगेत स्नान करता येईल, असा ज्ञानेश्वरीरूपी मराठी घाट बांधला आणि 'गीतार्थ मऱ्हाटिया केला लोकांयय।' लोकांना समजेल अशा स्पष्ट रीतीने संस्कृतातील गीतार्थ मराठीत आणला.'

वास्तविक माउलींनी मराठीमध्ये ज्ञानेश्वरीचा प्रपंच मांडला तरीही ज्ञानेश्वरी समजणे तितकेसे सोपे नाही. व्यासंगाने, अभ्यासाने, वाचनाने, पारायणाने किंवा श्रवणाने ज्ञानेश्वरीचे अंतरंगाकडे जावे लागते. ज्ञानेश्वरी मला समजेल का? हा सारा संशय सोडून ज्ञानेश्वरीचा स्पर्श व्हायला हवा.

**- किशोर गांधी**

# स्वतःला उच्चशिक्षित समजणारा पुरता अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेला आजचा अंध समाज

बुवा तिथे बाई हे गणित आजचे नाही हो पुर्वी पासुन चालत आलय हे. बरं तेव्हा शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अंधश्रद्धा माणसांमध्ये जास्त असायची विशेष करून बायकांमध्ये. ती आजही आहे. पुर्वी अडाणी बायका होत्या. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे त्यांना समाजातील जास्त गोष्टी माहीत नसायच्या. कुठलेही ज्ञान महिलांना नसायचे. फक्त चुल आणि मुल एवढीच तिची ओळख होती. पण आताच्या स्वतःला उच्चशिक्षित समजणाऱ्या बायांनी बुवाबाजीकडे वळावं ही खुप मोठी शोकांतिका आहे. आजही अनेक घरांमधील बायका मग त्या गरीब घरातील असो किंवा श्रीमंत घरातील असो त्या कुठे ना कुठे महाराज भोंदूबाबा भविष्यकार अंगात येणारा भोंदू यांच्याकडे जात असतात बर यांना साथ देणारे घरातील पुरुषमंडळी देखील यांच्या सोबतीला असतात बरं का...

आज आपण सगळे पाहतोय नाशिकच्या ऊच्चशिक्षीत मर्चंट नेव्हीचा कॅप्टन असलेला माणूस नावाला कलंक असलेला नराधम अशोक खरात. खरं म्हणजे याने त्याचे भोंदूगिरीचे दुकान थाटले पण या त्याच्या दुकानात गिऱ्हाईक म्हणून जाणाऱ्या बायका मात्र स्वतः होऊन त्याच्याकडे जात होत्या. बर सोबत पतीला देखील घेऊन जात होत्या. असही नव्हते की त्या अडाणी होत्या आणि त्यांच्या भोळेपणाचा फायदा हा खरातबाबा घेत होता. अहो आयुष्यात कितीही अडचणी असू द्या ना मग त्या कोणत्याही असू द्या. परिस्थिती सुधारण्यासाठी कष्टाची जोड असायला हवी. मुलबाळ होत नसेल तर चांगल्या स्पेशालिस्ट स्त्रीरोगतज्ञाकडे जा. त्यांची ट्रिटमेंट घ्या. त्यांचा सल्ला घ्या. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आता कोणतीच गोष्ट अशक्य नाही. मग हे अस सार असताना का बर बिनडोक पुरुष आपल्या बायकोला या नराधमाच्या बंद केबिनमधे एकट्या बायकोला आत पाठवून ते बाहेर बसत होते. बर ती आत गेली की तो मुर्ख बाबा म्हणायचा मी तुझा कृष्ण आणि तू माझी राधा आहेस आणि ही बिनडोक शिकलेली बाई त्याच्यावर विश्वास ठेवून तो जस म्हणेल तसेच करत होती. अरे शिकलेल्या बायका तुम्ही खुशाल त्या हरामखोराची लघवी काय आणि अजून काय काय पित होता. एकीनेही कसा आवाज उठवला नाही त्याच्याविरोधात. अल्पवयीन मुलींपासून ते वयस्कर बाईपर्यंत सर्वांनीच कशी या खरातबाबाला साथ दिली. बर नुसत्या महिलाच यामध्ये बळी पडल्या नाही तर पुरुषदेखील त्याच्याकडे शक्तीवर्धक औषधांसाठी जायचे आणि हे औषध म्हणजेच अशोक खरातचे मूत्र आणि अजून काय काय होते ते त्यालाच माहित. कोणत्या काळात जगतोय हो आपण?

आपले जे महापुरुष होऊन गेले त्यांनी अनेक चुकीच्या प्रथा बंद केल्या. शिक्षण कमी होते पण ते विचारांनी महान होते पण आज आम्ही काय आहोत कसे वागत आहोत. चुकीच्या गोष्टींना आज आम्ही खतपाणी घालून आमचीच इज्जत आम्ही वेशीला टांगत आहोत. महिलांनो सुधरा अजूनही आजही खुप चुकीच्या गोष्टींचे समर्थन करणाऱ्या या महिलाच आहेत. घरात आर्थिक अडचण आली की अनेक बायका अंगारा धुपारा करणारा सुकून बघणारा किंवा खडे अंगठ्या देणाऱ्याकडे जातात. तो मागेल तेवढे पैसे देतात. अगं बायांनो परिस्थिती सुधारवण्यासाठी सोबतीला कष्टाची जोड असेल आणि नको त्या गरजा कमी केल्या तर परिस्थिती नक्कीच सुधारेल. यामध्ये राजकारणात उच्च पदावर विराजमान असणाऱ्या बायका काही आयपीएस अधिकारी मंत्री असे अनेक मोठ मोठे लोक या स्वतःला कृष्णाचा अवतार समजणाऱ्या खरात बाबाकडे जात होते बर एवढच नाही तर हा बाबा बाहेर या लोकांना तास तास ताटकळत ठेवत होता आणि केबिन बंद करून आतमध्ये महिलांसोबत अश्लिल चाळे नको नको ते करत होता. एकीनेही कसा आवाज उठवला नाही हो. एवढेच नाही तर तो अघोरी विद्या देखील करायचा म्हणे यामध्ये तर एका उच्चपदावरील महिलेने बाबाच्या सांगण्यानुसार अनामिका हे बोट कापून घेतलय म्हणे. अहो हेच का आमचे उच्चशिक्षण ? स्वतःला उच्चभ्रू समजणाऱ्या महिला अशा वागत असतील तर सर्वसामान्य कमी शिकलेल्या बिचाऱ्या महिला अशा नराधमाच्या नक्कीच आहारी जातील. अहो आयुष्यात कितीही अडचणी असू द्या ना मग त्या कोणत्याही असू द्या. परिस्थिती सुधारण्यासाठी कष्टाची जोड असायला हवी. आपले जे महापुरुष होऊन गेले त्यांनी अनेक चुकीच्या प्रथा बंद केल्या. शिक्षण कमी होते पण ते विचारांनी महान होते म्हणून ते आजही अमर आहेत त्यांच्या विचारांनी त्यांच्या कर्तृत्वाने त्यांनी इतिहास रचला. पण आज आम्ही काय आहोत कसे वागत आहोत. चुकीच्या गोष्टींना आज आम्ही खतपाणी घालून आमचीच इज्जत आम्ही वेशीला टांगत आहोत.

आपण संसारीक माणसं आहोत घराकडे परिवाराकडे लक्ष द्या. सध्याचा काळ खुप खतरनाक आहे. मुलांना मुलींना जपा त्यांना चांगल्या वाईटाची जाणीव करून द्या. झगमगाटीचे चमकोगिरीचे जीवन सोडून द्या. आपले घर परिवार आपल्यालाच चालवायचा आहे. त्यामुळे चुकीच्या गोष्टी, बुवाबाजी भविष्यकार अंगात येणारे यांच्याकडे जाण्याचे टाळा कधीच वाईट वेळ तुमच्यावर येणार नाही आणि चुकीच्या ठिकाणी तुम्ही फसणार नाही.



शब्दांकन : **सौ. आशा सुधीर साठे,**
सैनिकपत्नी, अहिल्यानगर.
मोबा. ९६०४०५६९२८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात होणार

## आंबेडकर जयंतीपूर्वी पोलीस प्रशासनासोबत आंबेडकरी समाजाची बैठक



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासोबत समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीत जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उद्भवणाऱ्या विविध अडीअडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

नगर - महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंतीनिमित्त आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक यांच्यासोबत समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीत जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उद्भवणाऱ्या विविध अडीअडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी समाजाच्या वतीने मांडण्यात आलेल्या विविध मागण्यांवर पोलीस प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत त्यांना मान्यता देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे यंदाची आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण आणि सुरळीत पार पडण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी सांगितले, आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार असून कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडले जातील. तसेच मिरवणुकीदरम्यान लावण्यात येणारा डीजे शासकीय नियमांचे पालन करूनच वाजविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीमुळे आंबेडकरी समाज आणि पोलीस प्रशासन यांच्यात समन्वय साधला गेला असून जयंती उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडणार आहे. यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, जयंत गायकवाड, किरण दाभाडे, सुनील क्षेत्रे, विशाल गायकवाड, विलास साठे, सिद्धार्थ आढाव, भाऊ भिंगारदिवे, मुन्ना भिंगारदिवे, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, अक्षय भिंगारदिवे, अजिंक्य भिंगारदिवे, अमित काळे, गौतम म्हस्के, महेश भोसले, सुजित घंगाळे, जय कदम, अंकुश मोहिते, निलेश शिंदे, अजय पाखरे, सचिन शेलार, गौरव साळवे, राहुल साळवे, शोभा गाडे, विलास साठे, निखिल शेलार, विवेक भिंगारदिवे, विशाल भिंगारदिवे, कौशल गायकवाड, सौरव पंचमुख, पप्पू वाघमारे, करण भिंगारदिवे, यशोदास वाघमारे, आकाश शिंदे, सिद्धांत गायकवाड, वृषाल साळवे, सुनील साळवे, ऋषि गायकवाड, निलेश शिंदे, रोहन रोकडे, आकाश भिंगारदिवे, सचिन धीवर, महेश पाखर, विकी पाटोळे, अजय आंग्रे, कुपाल भिंगारदिवे, सूर्यकांत पाखरे, सचिन जमधडे, विशाल कदम, आकाश गायकवाड, मुन्ना भिंगारदिवे, करण साळवे, संजय साळवे, गणेश गायकवाड, विशाल गायकवाड, अनिकेत गायकवाड, राहुल साळवे, अजिंक्य भिंगारदिवे, भाऊ भिंगारदिवे, अक्षय भिंगारदिवे, महेश भोसले, सुजित घंगाळे, ऋषी विधाते आदीसह समाज बांधव व पोलीस अधिकारी उपस्थित होते.



अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल राज्यस्तरीय स्पर्धेसाठी १८ वर्षाखालील मुला मुलींचा संघ जाहीर करण्यात आला.

# जिल्हा बास्केटबॉल राज्यस्तरीय स्पर्धेसाठी १८ वर्षाखालील मुला - मुलींचा संघ जाहीर

नगर - महाराष्ट्र बास्केटबॉल असोसिएशन व नाशिक जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ मार्च ते ४ एप्रिल या दरम्यान १८ वर्षाखालील मुला मुलींचा राज्यस्तरीय स्पर्धा होत आहे त्या स्पर्धेकरिता अहमदनगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ सहभागी होणार आहे अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनच्या वतीने २२ मार्च रोजी संघ निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती

निवड झालेले खेळाडू पुढील प्रमाणे - मुले सुहास चव्हाण (बॉलर्स क्लब), अथर्व काकडे (एसबीसी क्लब), श्रीनाथ म्हस्के, संजय शिनगारे, अवनीश काळे (एसबीसी क्लब), कार्तिक बाबर (बॉलर्स क्लब), आर्यन चिंचवणे (एसबीसी क्लब), अर्णव शिंदे, मोनीश खुबचंदणी, शारोन शिंदे (बॉलर्स क्लब), आदित्य कोतकर (केबीसी क्लब), सार्थक सोनवणे (कोपरगाव क्लब),

तसेच मुलींचा संघ पुढील प्रमाणे - बसरा मोमीन, निकिता भिंगारदिवे (अहमदनगर कॉलेज), प्रिन्सि कुकरेजा, अनन्या राळेभात, पियुषा सानप (जामखेड), श्रावणी शिनगारे, जिया सहानी, प्रांजल दहातोंडे, वैष्णवी शेळके, अनन्या कुलकर्णी, गिरीजा लोखंडे, आयुष्या बाले (सावेडी क्लब) या दोन्ही संघांना अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव कैलास शानबाग व सहसचिव संजय ढोणे यांनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# अशोक खरात हे ज्योतिष नाही



संतोष घोलप (ज्योतीष)

नगर - अशोक खरात यांचा ज्योतिष शास्त्राशी कुठलाही संबंध नाही. स्वतःला ज्योतिष भासवून व कुठल्याही देव-देवतांचे नाव वापरून, बोट कापणे, चिंचोके देणे असे थोतांड करणे हे निव्वळ लोकांना भीती दाखवून व ब्रेनवॉश करून स्वतःला हवे ते साध्य करून घेण्याचा प्रकार आहे. मी स्वतः कामख्या देवीचा भक्त आहे. व मी दर महिन्याला माँ कामख्या देवी, गुवाहाटी येथे दर्शनासाठी जातो. पण कामख्या शास्त्रात व ईतर कुठल्याही शास्त्रात असे प्रकार लिहिलेले माझ्या पाहण्यात कधीही आले नाहीत. असे ज्योतिष संतोष घोलप (आहिल्यानगर) यांनी सांगितले.

घोलप यांनी सोशल मिडीयावरील विविध ज्योतिष समूहांना संघटित करून सोशल मिडीयावर एक ज्योतिष महासंघाची निर्मिती करून त्याचे प्रमुखपद भूषवले होते. व त्यातून सोशल मिडीयावरून स्वतःला ज्योतिष भासवणाऱ्या भामट्यांचा बंदोबस्त केला होता.

अशोक खरात यांना ज्योतिष शास्त्राचे कुठलेही ज्ञान नाही, असे त्यांच्या कृतीतून दिसून येते. किंबहुना, ज्योतिष शास्त्रासारख्या अत्यंत प्राचीन व गहन विषयाचे ज्ञान मिळवण्याची पात्रता अशोक खरात सारख्या व्यक्तीकडे नसते. असे अनेक भोंदू व्यक्ती आपल्या सोईनुसार ज्योतिष शास्त्राचा बुरखा घेऊन लोकांना मूर्ख बनवण्याचे काम करत आहेत.

समाजाने जागरूक राहणे अत्यंत गरजेचे आहे व कुठल्याही प्रलोभनांना बळी पडू नये. ज्योतिष हे एक विज्ञान आहे व हे ब्रह्मांडातील हालचालींचा वेध घेणारे व त्यांचा सजीव सृष्टीवर होणारा परिणाम दर्शवणारे गहन शास्त्र आहे. या पृथ्वीवर सिंधूघाटी संस्कृती, हडप्पा संस्कृती, मिस्र संस्कृती, माया संस्कृती सह आजपर्यंत ज्या-ज्या संस्कृतींचा शोध लागला, त्या प्रत्येक संस्कृतीत ज्योतिष अस्तित्वात होते.

आजही पृथ्वीवर असा एकही देश नाही की जिथे ज्योतिष शास्त्राचा वापर होत नाही. परंतु, कोणी स्वतःच्या सोयीप्रमाणे ज्योतिष शास्त्राचा वापर करून समाजाला मूर्ख बनवत असेल, तर त्यात ज्योतिष शास्त्राचा दोष नाही, असे संतोष घोलप यांनी स्पष्ट केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# शहरातील गाळेधारकांवर महापालिकेचा अवाजवी भाड्याचा बोजा

## उपमहापौर धनंजय जाधव व स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे यांना व्यापारी आघाडीचे निवेदन



महापालिकेकडून आकारले जात असलेले अवाजवी भाडे रद्द करावे, या मागणीचे निवेदन उपमहापौर धनंजय जाधव व स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांना देताना व्यापारी आघाडीचे पदाधिकारी.

नगर - अहिल्यानगर महानगरपालिका गाळेधारकांकडून अवास्तव व बेकायदेशीर पद्धतीने वाढीव भाडे आकारत आहे. याबाबत व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, ही भाडेवाढ तात्काळ रद्द करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष महेश गुगळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यासंदर्भात उपमहापौर धनंजय जाधव व स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी नगरसेवक निखिल वारे, महेश लोंढे, गोरख पडोळे, संजय ढोणे, भाजपा उपाध्यक्ष गोपाल वर्मा तसेच व्यापारी आघाडीचे पदाधिकारी हर्षल बोरा, नीरज राठोड, रुपेश वर्मा, सुरेश लालबागे, लक्ष्मीकांत तिवारी, संजय कांगडा, प्रशांत डहाळे, महेंद्र नांदुरकर, देवेंद्र दुधाळे, हेमंत पवार, प्रशांत बुऱ्हाडे आणि जुना दाणे डबरा व्यापारी संघटनेचे अरुण पारेख, प्रकाश बोरा, विजय बोंद्रे, राजेंद्र गांधी, संतोष भटेवरा, किरण राका, भाऊसाहेब पांढरे, धीरज पोखरणा, विजय गांधी, प्रवीण सुराणा, वेणुगोपाल झंवर आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, महापालिकेच्या गाळेधारकांकडून घटनाबाह्य व अवाजवी भाडे आकारणी करण्यात येत असून ही वाढ तात्काळ रद्द करण्यात यावी. गाळ्यांचे मालक स्वतः महानगरपालिका असताना गाळेधारकांकडून घरपट्टी व इतर कर आकारणे अन्यायकारक असल्याचेही व्यापाऱ्यांनी नमूद केले. ६ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र (असाधारण भाग चार-ब, क्र. ४१८) नुसारच नवीन भाडे आकारणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सन २०१६-१७ मधील मूळ भाडे आणि त्यानंतर करण्यात आलेल्या वाढीत मोठी तफावत असून ती तातडीने दुरुस्त करावी, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले. तसेच २० जुलै २०१८ रोजी झालेल्या महासभेत गाळेधारकांची भाडेवाढ रद्द करण्याचा प्रस्ताव क्रमांक ३ मंजूर झाला होता. मात्र, या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झालेली नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.

सदर गाळेधारक हे सुमारे ५० वर्षांपूर्वीचे असून त्यावेळी नगरपालिकेने दिलेल्या खुल्या जागेवर त्यांनी स्वतःच्या खर्चाने गाळे उभारले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून केवळ खुल्या जागेचेच भाडे आकारण्यात यावे, अशी मागणीही व्यापाऱ्यांनी केली आहे.

# अशिक्षितांनी समर्थपणे संसाराचे कोर्ट थांबवण्याची कौतुकास्पद कामगिरी बजावली

## युवराज पाटील यांचे प्रतिपादन, भगवान महावीर व्याख्यानमाला : पुष्प चौथे

नगर – भारतीय संस्कृतीतील कुटुंब व्यवस्थेत भली मोठी कुटुंबे चालवणारे एक कुटुंब प्रमुख असायचे. ते अत्यंत समजूतदारपणाने कुटुंब चालवायचे. अनुभवाने संपन्न असलेली ही अशिक्षित मंडळी आजच्या सुशिक्षितांना लाजवेल, असे कार्य करायची. अशिक्षितांनी संसाराचे कोर्ट समर्थपणे थांबवण्याची कौतुकास्पद कामगिरी बजावली. सुशिक्षितांनीच संसारात कोर्टाला प्रवेश दिला, असे प्रतिपादन कोल्हापूर येथील युवराज पाटील यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री.आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफताना ते अस्वस्थ वर्तमान आणि आपली भूमिका या विषयावर बोलत होते. सिमा मुनोत यांनी स्वागत करून आभारही मानले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी परिचय करून दिला. श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) व हर्ष मुनोत यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुरेश कटारिया, संतोष गांधी, सिमरन मुनोत, सपना कटारिया आदी उपस्थित होते.

श्री.पाटील पुढे म्हणाले, आज शिक्षणाने सुशिक्षित झालेली पिढी स्वतःचा संसार नेटकेपणाने सांभाळू शकत नाही, अशी विदारक स्थिती निर्माण झाली आहे. कारण संसारात आई–वडील, सासू–सासरे, नणंद, दीर, जावा, भावजया, अशा रक्ताच्या नात्यालाच स्थान राहिले नाही. स्वार्थाच्या भावनेमुळे कुटुंबव्यवस्था हरवत चालली. शिक्षणाने माणूस शहाणा, समजूतदार, समाजाला मदत करणारा होण्याऐवजी तो– मी, माझं, माझ्यासाठी आणि माझ्यापुरतंच असा व्यक्तिकेंद्रित झाला. माणसांचा माणसांशी असलेला आपलेपणा कमी होत चालला. कोणत्याही विद्यापीठाची पदवी नसलेली अशिक्षित मंडळी विवाह जमवताना संसार सुखाचा कसा करावा? याचे आदर्श उभे करायची. आज विवाहाची जबाबदारी घेणारी माणसंच शिल्लक राहिली नाहीत! कारण स्वतःच विवाह ठरवणारी नवी पिढी निर्माण झाली. एकमेकांबद्दलचा विश्वास कमी होत चालला. ऑनलाइनच्या जगात जगणं ऑफलाइन कधी झालं ते कळलं नाही. माणसाला एकट करण्यात व्यवस्था मात्र यशस्वी झाली.

आपल्या घराशेजारी रहाणारा आपलाच ही भावना संपत चालली. इमारती उंचच उंच वाढल्या माणसं मात्र खुजी झाली. मृत्यू झाल्यानंतर डोळ्यात पाणी न येणारी पिढी निर्माण झाली. संस्कार घडविण्यासाठी हक्काने ओरडणारी माणसे आहेत तोपर्यंतच जगण्याला





राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म. सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफताना युवराज पाटील. शेजारी व्याख्यानमालेतील क्षणचित्रे.

अर्थ आहे. चिमण्यांचा चिवचिवाट बंद झालाय. मानवी नात्यांच्या बाबत दांभिकता वाढत चालली. संवेदनशीलता हरवत चालली. आजूबाजूच्या घटनांबद्दल सहवेदना असली तरच संवेदनशीलता जपली जाईल. पैसा, पद, प्रतिष्ठा यामुळे स्वार्थी वृत्ती वाढत चालली. प्रेम, जिव्हाळा, माया मिळेना असे अस्वस्थ वर्तमान आहे. मायेने जवळ बसून वेळ देता येत नाही, अशी स्थिती आहे, स्वतःला सुशिक्षित समजणारे आम्ही आनंदी असल्याचे दाखवतात मात्र वस्तूस्थिती वेगळीच असते. आजच्या पिढीला सांत्वन करणेही जमत नाही. भावनिक विकास प्रगतीचे लक्षण मानले नाही. बौद्धिक विकास भावनिक विकासावरच अवलंबून असतो, हे सत्य आहे. भावनिकदृष्ट्या स्थिर नसलेले जगातील कोणतीही गोष्ट मिळवू शकत नाहीत. नवीन पिढी नैतिकतेला महत्त्व देत नाही मात्र व्यक्तिमत्व विकासाचा टेंभा मिरवते. चांगले कपडे, चांगले शूज, किमती मोबाईल, ब्रॅण्डेड परफ्युम म्हणजे व्यक्तिमत्व विकास का? असा सवाल करताना त्यांनी चारित्र्याचा आणि नैतिकतेचा विकास म्हणजे व्यक्तिमत्व विकास होय, असे सांगितले. प्रगत माध्यमांमुळे आपल्याला देशात काय चालले? ते कळते मात्र आपल्या घरातील आईच्या, आपल्या पत्नीच्या, आपल्या मुलांच्या मनात काय चालले? हे कळत नाही! मोबाईलमधील रील पहात बसल्याने एकाग्रता संपत चालली आहे. निर्णय क्षमता स्ट्राँग न होता चल–बिचल वाढत चालली आहे. दारूपेक्षाही भयानक स्थिती रील मुळे निर्माण होण्याचा धोका आहे! घरातील संवाद मुका होऊ लागला आहे. पैशा व्यतिरिक्त काहीच बोलायचे नाही, अशी अनेक घरातील स्थिती आहे. नात्यांमधील जिव्हाळा संपत चालला आहे. आपल्या वागण्याचा आपल्या जगण्यावर काय परिणाम होतो? याचा विचारही केला जात नाही!

माध्यमांमधून सातत्याने अनैतिकता सांगितली जाते. माध्यमांनी विचारांची पद्धत बदलवून टाकली. नकारात्मक विचार वाढवण्याचा प्रयत्न केला. वृत्तपत्रात चांगल्या बातम्यांना स्थान राहिले नाही. आपले जगणे सोपे होईल तेव्हाच आनंद निर्माण होईल.

तंत्रज्ञानाने जगणं सुलभ होण्याऐवजी अवघड होत चालले आहे. आईच्या गर्भातील बाळाच्या हृदयाचा ठोका कधी सुरू होतो? हे आजच्या प्रगत विज्ञानाला शोधता आलेले नाही. आपला अहंकार संपवता आला तर आपल्या जीवनातील दुःख संपेल. कष्ट करण्याची, संघर्षाला समर्थपणे सामोरे जाण्याची जाणीव मुलांमध्ये निर्माण करा. माफ करायला शिका. नम्र व्हा. मनाला त्रास देणाऱ्या घटना सोडून देणे शिका. आपल्याला निर्भय, निस्वार्थी, निपक्ष होता आले पाहिजे त्यातून आनंद मिळेल. आजची सर्व क्षेत्रामधील वर्तमान स्थिती अस्वस्थता निर्माण करणारी असल्यामुळे आपला आनंद आपणच निर्माण करण्याची भूमिका निभावावी लागणार आहे, असे श्री. पाटील यांनी सांगितले. व्याख्यानास शहरासह उपनगरातील स्त्री–पुरूष श्रोत्यांची उपस्थिती लक्षवेधी होती.

# मुलीवर अत्याचार करणाऱ्या पहारेकऱ्याला जन्मठेपेची शिक्षा

नगर – घराजवळ खेळणाऱ्या अल्पवयीन मुलीला खाऊचे आमिष दाखवून मंगल कार्यालयात नेत तिच्यावर अत्याचार करणाऱ्या पहारेकऱ्याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. युसुफ हमीद कुरेशी (वय ३४, रा. गाझीनगर, काटवन खंडोबा, अहिल्यानगर) असे जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्या दोषीचे नाव आहे.

ऑगस्ट २०१५ मध्ये घडलेल्या या घटनेत, पीडिता तिच्या घराजवळ खेळत होती. त्यावेळी एका मंगल कार्यालयात पहारेकरी असलेल्या युसुफ हमीद कुरेशी याने पीडितेला खाऊचे आमिष दाखवून मंगल कार्यालयात नेले. तेथे त्याने तिच्यावर अत्याचार केला. दुसऱ्या दिवशी पीडितेच्या आईने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन यांनी केला व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. विशेष पॉस्को न्यायालय तसेच जिल्हा न्यायाधीश डॉ. यू. जे. मोरे यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या खटल्यात एकूण १८ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. यामध्ये पीडिता, तिची आई, वैद्यकीय अधिकारी व रासायनिक विश्लेषक यांच्या साक्षी निर्णायक ठरल्या.

निकाल देताना न्यायालयाने बालसुरक्षेच्या प्रश्नावर स्पष्ट भाष्य केले. पीडित मुलीचा जन्म १५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी झाल्याचा उल्लेख करत, प्रत्येक बालिकेला सुरक्षित आणि निर्भयपणे जगण्याचा अधिकार असल्याचे नमूद करण्यात आले. आरोपीच्या कृत्यामुळे या मूलभूत हक्कांवर गदा आल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या या गंभीर प्रकरणात विशेष पॉस्को न्यायाधीश डॉ. यू. जे. मोरे यांनी आरोपी युसुफ हमीद कुरेशी (वय ३४, रा. गाझीनगर, काटवन खंडोबा, अहिल्यानगर) याला भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तसेच २२ हजार रुपयांचा दंडही ठोठावला असून, ही रक्कम पीडितेला देण्याचे आदेश दिले आहेत.

सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. राजेश आर. त्रिमुखे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांना सहायक पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, अंमलदार आर. डी. आडसुळ, याकुब सय्यद व सचिन डमाळे यांनी सहकार्य केले.

# अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल; व्हाईस चेअरमनपदी कैलास चावरे यांची बिनविरोध निवड

### संचालक मंडळाचा एकमताने निर्णय

नगर – अहिल्यानगर महापालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल तर व्हाईस चेअरमनपदी कैलास चावरे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी ज्योतीताई हराळे यांनी पाहिले.




अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल व व्हाईस चेअरमनपदी कैलास चावरे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

चेअरमन पदासाठी बाबासाहेब मुदगल यांच्या नावाची सूचना संचालक सोमनाथ सोनवणे यांनी मांडली तर अनुमोदन संचालिका प्रमिलाताई पवार यांनी दिले. त्याचप्रमाणे व्हाईस चेअरमन पदासाठी कैलास चावरे यांच्या नावाची सूचना संचालक बलराज गायकवाड यांनी केली तर अनुमोदन संचालक अजय कांबळे यांनी दिले.

या प्रसंगी तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, माजी चेअरमन विजय कोतकर, माजी व्हॉइस चेअरमन किशोर कानडे, संचालक सतीश ताठे, विकास गीते, गुलाब गाडे, शेखर देशपांडे, बाळासाहेब गंगेकर, बाळासाहेब पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी आदींसह कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

यावेळी बाबासाहेब मुदगल म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी माझी बिनविरोध निवड झाली असून संचालक मंडळांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, त्याला न्याय देत सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले जातील. ते पुढे म्हणाले की, यावर्षी पतसंस्थेला सुमारे २ कोटी ११ लाख ८७ हजार ८१२ रुपयांचा नफा झाला असून वसूल भाग भांडवल ५ कोटी ५९ लाख ४१ हजार ३८० रुपये आहे. सभासद ठेव सुमारे २४ कोटी १४ लाख ६८ हजार ८६८ रुपये असून एकूण कर्जवाटप २८ कोटी ५४ लाख २२ हजार ६२० रुपये आहे. तसेच, यावर्षीपासून परीविक्षाधीन सभासदांना सुमारे १ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. सभासदांना आरोग्य तपासणीसाठी तातडीची आर्थिक मदत, तसेच त्यांच्या पाल्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शैक्षणिक व विवाहासाठी कर्जरूपी मदत दिली जाते. पतसंस्थेच्या उज्वल भविष्यासाठी आम्ही सकारात्मक काम करू, असेही त्यांनी सांगितले.

कैलास चावरे यांनी संचालक मंडळ व सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले व पुढील काळात संस्थेच्या प्रगतीसाठी कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. बिनविरोध निवडीतून नव्याक पदाधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली असून पतसंस्थेच्या विकासासाठी ते सकारात्मक भूमिका निभावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कनिष्ठ अभियंत्याच्या सर्व संपत्तीची चौकशी करावी; ठोस कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा



नगर – जिल्हा परिषद, अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यावर बिले मंजूर करताना अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आरोप करण्यात आले आहे. नुकतेच लाच घेताना गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांच्या कामांची सखोल चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भातील निवेदन समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी नाशिक विभागीय आयुक्त तसेच जिल्हा परिषद प्रशासनाला दिले आहे.

निवेदनात म्हंटले आहे की, सार्वजनिक बांधकाम उपविभागातील कनिष्ठ अभियंता तथा अतिरिक्त पदभार उपअभियंता म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने २३ मार्च रोजी मौजे देहरे येथील दत्त मंदिर स्मशानभूमी सुशोभीकरणाच्या ८ लाख २२ हजार २०६ रुपयांच्या कामाचे बिल मंजूर केले. या बिलाच्या मंजुरीसाठी त्यांनी संबंधित ठेकेदार यांच्याकडे एकूण रकमेच्या २ टक्के, म्हणजेच सुमारे १६ हजार रुपयांची मागणी केल्याप्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्यावर नुकताच गुन्हा दाखल केला आहे.

तसेच संबंधित कामामध्ये काही त्रुटी असतानाही जाणीवपूर्वक बिल मंजुरीसाठी विलंब करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, अनेक गावांमधील कामांमध्ये त्रुटी असतानाही बिले मंजूर करण्यात आली असून, शासनाच्या नियमांची पायमल्ली करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ गोळा केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या मालमत्तेची माहिती शासनाकडे सादर करणे बंधनकारक असताना, सदर अधिकाऱ्याने मालमत्ता, खरेदी किंवा गुंतवणुकीबाबत आवश्यक माहिती सादर केली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. यामुळे त्यांनी मंजूर केलेल्या सर्व कामांची शासन परिपत्रकानुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून विभागीय स्तरावर सखोल चौकशी करावी. तसेच त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेची उघड तपासणी करून दोषी आढळल्यास त्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी समितीने केली आहे.

दरम्यान, येत्या एका महिन्यात यासंदर्भात ठोस कारवाई न झाल्यास अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# केंद्रप्रमुख परीक्षा रद्द करा : आ. प्रशांत बंब यांची मागणी

नगर – मागील महिन्यात ३ व ४ फेब्रुवारी रोजी राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या केंद्रप्रमुख मर्यादित विभागीय परिक्षेत अनियमितता झाल्याचा आरोप करून ही परीक्षा रद्द करून ती एमपीएससी मार्फत घेण्याची मागणी आमदार प्रशांत बंब यांनी केली आहे.

राज्यातील प्राथमिक शिक्षकांमधून मर्यादित विभागीय परीक्षेच्या माध्यमातून केंद्रप्रमुख पदे भरण्यासाठी मागील फेब्रुवारी महिन्यात ही परीक्षा घेण्यात आली होती. तीन वर्षापासून रखडलेली ही परीक्षा ऐन राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या धामधुमीत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली. ही परीक्षा निर्धारित अभ्यासक्रमानुसार झाले नसल्याची व परीक्षेची काठिण्यपातळी सुमार दर्जाची असल्याची ओरड सातत्याने होत होती. हाच धागा पकडून आमदार बंब यांनी आरोप केला आहे की ही परीक्षा चौथी व पाचवीच्या स्कॉलरशिपच्या तुलनेने देखील अतिशय कनिष्ठ व सुमार दर्जाची काठिण्यपातळी असलेली होती. ३८००० शिक्षक परीक्षार्थीपैकी तब्बल २८०२२ परीक्षार्थींना २०० पैकी १०० हून अधिक गुण आहेत, यातूनच या परीक्षेचा दर्जाहीनता दिसून येते, असा आरोप बंब यांनी केला आहे. यातून कोणत्या गुणवत्तेचे केंद्रप्रमुख निवडले जाणार आहेत. असा प्रश्न आमदार बंब यांनी शिक्षणमंत्र्यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रात केला आहे. अशी गुणवत्ताहीन परीक्षा घेऊन शिक्षण घेणारी भावी पिढी बरबाद होण्यापासून वाचविण्यासाठी निकाल जाहीर झाला असला तरी ही परीक्षा रद्द करून ती पुन्हा एकदा एमपीएससी मार्फत पुरेशा काठिण्यापातळीसह घेण्याची व परिक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेची चौकशीची मागणी आमदार बंब यांनी केली आहे.














Legacy of Trust
SINCE 1935

91 YEARS

# वर्षे विश्वासाचे, अतुट नात्याचे !

राम नवमीच्या शुभदिनी

# कोहिनूर

वस्त्र दालनाला ९१ वर्ष पूर्ण झाले. आपण सर्वांनी आमच्यावर दाखविलेल्या विश्वासामुळे हे शिखर आम्हाला गाठता आले. या शुभदिनी
**कॉलेज रोड नाशिक** येथे
**नवीन दालनाचा शुभारंभ** करीत आहोत.

या ९१ वर्षाच्या प्रवासात
आपली नेहमीच आम्हाला साथ लाभली.
त्या बद्दल आम्ही आपले मनापासून
ऋणी आहोत.
हा प्रवास आपल्या
आशीर्वादाने असाच अखंड राहील...



पार्किंग | बिस्पोक टेलरिंग सुविधा | 365 DAYS आपल्या सेवेत | फॅशन डिझाइनर उपलब्ध | कॉर्पोरेट गिफ्ट व्हाउचर

कॉलेज रोड, **नाशिक** 7378 404 404 | एम.जी. रोड | कोहिनूर मॉल, सावेडी, अहिल्यानगर 7447 7447 90